# स्पंदन

2002-2003




## दूधसाखर महाविद्यालय,

बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर.

॥ विद्या परम भूषणम् ॥

श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)
ता. कागल, जि. कोल्हापूर संचलित.



दूधसाखर महाविद्यालय
(कला व विज्ञान)



दूधसाखर माध्यमिक
व उच्च माध्यमिक विद्यालय
(कला, विज्ञान व्यावसायिक
व सैनिक शाळा प्रवेश तयारी वर्ग)



दूधसाखर विद्यानिकेतन
(प्राथमिक विभाग)

**ठळक वैशिष्ट्ये**

- विविध शैक्षणिक शाखांसाठी भव्य व सुसज्ज इमारती
- उच्च गुणवत्ता प्राप्त शिक्षक वर्ग
- शिक्षण, कला, क्रीडा व संस्कारासाठी विशेष लक्ष
- अद्यावत ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा
- शांत व निसर्गरम्य परिसर
- भव्य क्रीडांगण व अभ्यासाची स्वतंत्र सोय

| मा. श्री. शामराव चौगलेसो | मा. श्री. दिनकररावजी जाधव | मा. श्री. बाबासाहेब पाटील |
|---|---|---|
| संस्था सचिव | अध्यक्ष | उपाध्यक्ष |

## संस्था मार्गदर्शक



मा. आमदार बजरंग देसाई



माजी. आमदार नामदेवरावजी भोईटे

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री.

# स्पंदन

**वार्षिक अंक दहावा**

**सन २००२-२००३**

◆ संपादक मंडळ ◆

**संपादक**

प्रा. आनंद वारके — मराठी

**विभागीय संपादक**

प्रा. धनंजय दिघे — हिंदी

प्रा. श्रीकृष्ण साळोखे — इंग्रजी

प्रा. सतिश गंगावणे — शास्त्र

दि प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट नियम ८, फॉर्म नं. ४ प्रमाणे
आवश्यक असलेली माहिती

# स्पंदन

| | |
|---|---|
| ■ प्रकाशन स्थळ | : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ■ प्रकाशनाचा काळ | : वार्षिक |
| ■ प्रकाशकाचे नाव | : मा. प्राचार्य शिवाजीराव पाटील |
| ■ राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| ■ पत्ता | : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ■ संपादक | : प्रा. आनंद वारके |
| ■ राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| ■ पत्ता | : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ■ मुद्रकाचे नाव | : श्री. सदाशिव रा. साबळे |
| ■ राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| ■ पत्ता | : आनंद ऑफसेट, का।। तारळे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर |
| ■ छाया | : अमर फोटो स्टुडिओ व रमेश फोटो स्टुडिओ, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ■ अक्षर जुळणी | : श्री. सतीश पाटील (गुडाळकर) |
| ■ पत्ता | : आनंद ऑफसेट, का।। तारळे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर |
| ■ मुखपृष्ठ | : श्री. उमेश पाटील, कोल्हापूर |

मी असे जाहीर करतो की वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

शिवाजीराव पाटील
प्राचार्य



या अंकातील कवी व लेखकांच्यां मताशी प्रकाशक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.
(फक्त खाजगी वितरणासाठी)

# संपादकीय........

'स्पंदन' हा आपल्या महाविद्यालयाचा वार्षिक अंक आता एका नव्या वळणावर आला आहे. महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर सांस्कृतिक, क्रीडा, व वक्तृत्व या स्पर्धातून चमकलेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनींची व प्रतिनिधींची आपेक्षा अशी होती की, या वर्षीचा 'स्पंदन'हा अंक रंगीत स्वरुपात आला पाहिजे. पण प्रश्न होता तो आर्थिक बाबीचा. मुलांची ही अपेक्षा संस्था अध्यक्ष मा. दिनकरावजी जाधवसो यांच्या समोर मांडली. त्यांनी हा अंक रंगीत करण्यासाठी श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि, बिद्री, ता. कागल कडून रु.५०००/- ची जाहिरात देऊन मुलांच्या या मागणीला मूर्त स्वरुप दिले आहे.

वार्षिक अंक ही महाविद्यालयीन युवापिढीच्या लेखणी आणि कुंचल्याला मिळणारी मोठी पर्वणी. मुलांच्या सृजनशीलतेला वाव देऊन त्यांच्यामध्ये विविध कलांची आवड वृध्दींगत करणे, त्यांची समीक्षा दृष्टी विस्तारीत करणे या वार्षिक अंक समितीने ठरविलेल्या उद्दिष्टासाठी मुलांच्याकडून विविध प्रकारच्या साहित्य व चित्र प्रकाराची मागणी केली असता प्रचंड प्रतिसाद ! त्यात 'स्पंदन'ला मर्यादा पानांची. मग एवढ्या साहित्यातून निवड आली. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या साहित्याचा समावेश 'स्पंदन'मध्ये होऊ शकला नाही. समावेश न झालेल्या साहित्यामध्येही निर्मितीची अनेक कौशल्ये आहेत. एका बाबीची मात्र नोंद करावी वाटते ती म्हणजे 'स्पंदन'साठी मागविलेल्या साहित्यामध्ये मुलींचा प्रतिसाद फारच कमी आहे. त्यांनी आपल्या विचाराला चालना दिली तर अनेक साहित्यविषयक अनुभव 'स्पंदन'मध्ये येतील. स्पंदनच्या पुढील अंकात हा बदल होईल अशी अपेक्षा !

'स्पंदन'च्या आकर्षकतेसाठी आनंद ऑफसेट, का।। तारळे, ता. राधानगरी चे व्यवस्थापक श्री सदाशिवराव साबळे तथा तात्या व त्यांच्या कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

वर नमुद केल्याप्रमाणे संस्था अध्यक्ष मा. दिनकररावजी जाधवसो, संस्था सचिव, संस्था संचालक व विभागीय संपादक यांच्या सहकार्यामुळे या अंकाचे संपादन करु शकलो. सहकार्याबद्दल आभार !

प्रा. आनंद वारके
संपादक

# व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| ♦ अध्यक्ष | : मा. श्री. दिनकररावजी भाऊसाहेब जाधव |
| ♦ उपाध्यक्ष | : मा. श्री. बाबासाहेब हिंदुराव पाटील |
| ♦ सदस्य | : माजी आम. नामदेवरावजी शंकरराव भोईटे |
| ♦ सदस्य | : मा. श्री. बापूसाहेब यशवंत भोसले |
| ♦ सचिव | : मा. श्री. शामराव शिवाजी चौगलेसो |
| ♦ सेक्रेटरी | : मा. प्राचार्य शिवाजीराव केशवराव पाटील |
| ♦ शिक्षक प्रतिनिधी | : मा. श्री. नंदकुमार धोंडी पाटील |
| ♦ शिक्षक प्रतिनिधी | : मा. श्री. यशवंत सिताराम पाटील |
| ♦ शिक्षक प्रतिनिधी | : मा. श्री. हरीदास दत्तू धायगुडे |
| ♦ शिक्षकेत्तर प्रतिनिधी | : मा. श्री. महादेव कृष्णा भोईटे |


## हार्दिक शुभेच्छा !

*सभासदाचे हीत हेच आमचे ब्रीद*

**श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पत संस्था मर्यादित, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर**

**आकर्षक व्याजदर, तत्पर सेवा**

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत्त भाग भांडवल - | १० लाख | वसूल भाग भांडवल | ५.०० लाख |
| ठेवी - | २५.०० लाख | कर्जे | २२.०० लाख |
| चालू नफा - | २५.०० लाख | गुंतवणूक | १०.०० लाख |
| दि. ३१/१२/२००२ अखेर | वार्षिक उलाढाल | ७५.०० लाख | |

चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, मानद सचिव, सचिव व सर्व सभासद

# संस्था पदाधिकारी व मान्यवर संचालक

श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री.व
श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री. (मौनीनगर) ता. कागल, जि. कोल्हापूर.



चेअरमन - मा. दिनकररावजी भा. जाधवसो



व्हा. चेअरमन - मा. बाबासाहेब हिं. पाटीलसो



श्री. विजयसिंह कृ. मोरे



श्री. प्रविणसिंह वि. पाटील



श्री. बापूसाहेब य. भोसले

# गुणगौरव
# विविध गुणदर्शन



लघु नाटिका सादरकर्ते बी. एस्सी. भाग ३ चे विद्यार्थी विद्यार्थिनी



मराठमोळ्या गिर्रेबाज लावण्यांचा ठसका



फॅन्सी ड्रेस स्पर्धेतील लमाण



अंताक्षरी
सहभाग
प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थीनी

# मान्यवर संचालक



श्री. नंदकिशोर या. सुर्यवंशी



श्री. सुरेश द. सुर्यवंशी



श्री. मारुती गो. फराकटे



श्री. धनाजीराव रा. देसाई



श्री. दत्तात्रय म. उगले



श्री. प्रकाश आ. देसाई



श्री. कृष्णात बं. पाटील



श्री. दिनकरराव श्री. आवदार



श्री. पंडीत द. केणे



श्री.मारुतीराव बं. सावडकर



श्री. दिनकर सं. कांबळे



सौ. लिलाबाई दि. पाटील



सौ. गीता के. चौगले



श्री. वाय. एस्. पाटील
कामगार प्रतिनिधी

# संस्था सचिव, प्राचार्य व संपादक मंडळ

संस्था मानद सचिव



मा. आर. डी. देसाईसो

संस्था सचिव



मा. शामराव शिवाजी चौगलेसो



प्राचार्य

मा. शिवाजीराव पाटीलसो

संपादक मंडळ

प्रा. धनंजय दिघे, प्रा. आनंद वारके,
प्रा. सतीश गंगावणे, प्रा. श्रीकृष्ण साळोखे



# मराठी विभाग

येता पीकाले बहार
शेताशेतात हिर्वय
कसं पिकलं रे सोनं
हिर्व्यामधून पिवयं ।

बहिणाबाई चौधरी

विभागीय संपादक
प्रा. आनंद वारके

# स्पंदन २००२-२००३

# अंतरंग

## गद्य विभाग

### ★ कथा


१) अंदर की बात ........................ विजय पाटील बी.ए.भाग ३
२) तो अजुनही वेडा झाला नव्हता ..... गजानन संकपाळ बी.ए.भाग ३
३) मातृ कर्तव्य ...................... अभिजीत पाटील बी.ए.भाग २
४) दिलासा .......................... कु. निता पाटील बी.ए.भाग ३


### ★ व्यक्तिचित्रे


१) प्रतिमूर्य .............................विजय देसाई बी.एस्सी. भाग ३
२) 'मृत्यूंजय'कार शिवाजीराव सावंत ..कु. धनश्री मुळीक बी.एस्सी. भाग ३
३) साहित्य शारदेच्या कंठातील कौस्तुभमणी ......विक्रमसिंह पाटील बी.ए.भाग २


### ★ लेख


१) आम्ही आमचे 'आदर्श' शोधतोय ...... कु. सरीता पाटील बी.एस्सी.भाग २
२) वक्तृत्व - एक वेड .................... संदीप मगदूम बी.ए.भाग २
३) व्यसन सोडा जीवनाशी नातं जोडा ...... कु. स्मिता पोवार बी.एस्सी.भाग ३




## पद्य विभाग


१) प्रेम ................................ प्रवीण पाटील बी.ए.भाग २
२) सोनेरी दिवस .............. कु. अश्विनी पाटील बी.ए.भाग २
३) आठवण .................. कु. सुमन मांडवकर बी.एस्सी. भाग १
४) पश्चाताप...................... कु. रुपाली वारके बी.ए.भाग ३
५) विदूषक ........................ राजाराम कांबळे बी.ए.भाग १
६) खंत.............................. उत्तम पालकर बी.ए.भाग ३
७) भेट .............................. राहूल चव्हाण बी.ए.भाग २
८) विश्व विनाशक .................... सागर कांबळे बी.ए.भाग ३
९) ओळख.......................... दयानंद भोई बी.ए.भाग २
१०) भोळा भाबडा तू शेतकरी.......... संतोष रानमाळे बी.ए.भाग १
११) भेटशील का ?.................. युवराज चौगले बी.ए.भाग १
११) श्रावण सरी ...................... दत्तात्रय पाटील बी.ए.भाग १
१२) वीर ............................ रामचंद्र पाटील बी.ए.भाग ३
१३) सुगी ........................ शिवाजी कांबळे बी.ए.भाग २
१४) जीवन ........................ ज्ञानदेव फासके बी.ए.भाग २
१५) आई .............................. संदीप साठे बी.ए.भाग २
१६) मंत्र्याची तिजोरी .............. सर्जेराव केसरकर बी.ए.भाग २
१७) मला वाटतं ...................... साताप्पा खोत बी.ए.भाग २
१८) प्रेमासाठी .................... दत्तात्रय चौगले बी.एस्सी. भाग ३
१९) माझं ध्येय .................. कु. गीतांजली शिंदे बी.ए. भाग २
२०) सृष्टी .......................... दिलीप पाटील बी.ए. भाग ३

# अंदर की बात

- विजय पाटील बी.ए. भाग ३

नाष्टा करण्यासाठी म्हणून मी, अशफाक आणि 'केळया' म्हणजे अजित केळकर कॅन्टिनमध्ये गेलो. अयोध्येला लागलेल्या 'मुहब्बत करने की चीज नहीं' या पिक्चरच्या चर्चेत भाग घेत म्हणाला.

'केळ्या,बॅड न्यूज यार !' एकदम आतली खबर तुझ्यासाठी. शमी आजच पटली बास ! आज्या केळकर पुरता खल्लास ! म्हणजे एकदम खल्लासच राव !

पाटलांच्या दिप्याला या आतल्या बातम्या कशा लागतात कोण जाणे ? पण तो एकदम बॉम्बशेलच टाकतो बुवा !

दिप्या आमच्या चर्चेत भाग घेत म्हणाला 'मुहब्बत करने की चीज नहीं' किती लांबलचक नाव. म्हणजे नाव घेईपर्यंत हिरो हिरॉईनला पटवायचा आणि नेमकं उलट 'मुहब्बत सिर्फ करने की चीज है' अस वाटावं. ज्यानं शमीला पटवलं त्यानं काय दाखवून दिलं ? हेच ना ? म्हणून म्हणतो या प्रोडयुसरला काही कळत नाही. 'मुहब्बत करने की चीज है'

यावर आम्ही तिघांनी दिप्याला आढ्यात घेतला आणि दिप्यानं 'अंदर की बात' सांगितली.

पण आज त्याच्यामुळं केळयाचा पार कोळसा झाला. हे बाकी खरंच ! केळयानं विचारल पटली म्हणजे ?

पटली म्हणजे पटली, खल्लास !

पण कशी ? केळ्यानं विचारलं तर दिप्यानं लगेच भाव खाल्ला.

"आज्या तू पण कमालच करतोस हां. लाईन तुझी मी कशाला नजर ठेवू तिच्यावर ? मला समजलं ते सांगितलं आज्या किती रे खुळचट तू ? तुझी लाईन ती शमी आणि तो तिचा यार, दोघंही गुल खिलवायला माझ्या साक्षीची वाट पाहत बसले होते, असं वाटतं काय तुला ? उगीच लफड्यात पडलो साला ! तु, तुझी शमी तिचा तो यार आणि ......."

माझ्याकडे पाहत दिप्या पुढे म्हणाला ... हां आता मध्येच माझ्या नावाचा उल्लेख आलेला पाहून मी दिप्याला तासून काढला.

ए ! मला कशाला मध्ये घालतो रे ! काय रे आज्या ?

समजावलयस ना त्याला मग बोलायला पण शिकव ! दिप्या म्हणाला मग काहीशा समजुतीच्या स्वरात आज्या म्हणाला - पण दिप्या तुझा यात काहीच वादा नाय मग तू आल्या आल्याच कशाला सांगितलस शमी पटल्यांच ? मला समजलं असतं की दुसरीकडून ?

आज्यानं बिनतोड सवाल टाकला. एकंदर हा वाद आणखीनच पेटणार हे ओळखून मी चार वडे आणि चार कप चहाची ऑर्डर ठोकली.

तेंव्हा दिप्याच म्हणाला, "शमी आज कॅन्टिनमागच्या गाड्यांच्या स्टँडजवळ बराच वेळ थांबलेली म्हणून मला संशय आला."

त्याची जर्र ऽ रा कुठं तार लागली होती. तर आज्या मध्ये पचकलाच ! पण हे सगळं मला आता का ऐकवतोस तू. मी, शमी आणि तिचा यार भिडू ना परस्पर समोर येवू तेंव्हा !

त्या सरशी दिप्यानं दाणकन् चहाचा कप टेबलावर आपटला. मध्येच असं बोलून घोळ घातला म्हणून मी टेबलखालनंच आज्याच्या मांडीवर पायताण झाडली.

"अग्ग ऽ आई गं ऽ !" करत आज्या कळवळला. त्याचं ढोपर टेबलला आपटलं कप खाली पडून फुटलेच, शिवाय दिप्याच्या अंगावर सगळा चहा खल्लास !

तसा दिप्या ताडकन् उठला. लाफा लगावण्यासाठी त्यानं हात उगरला. मी मध्ये पडलो तसे दिप्या मला म्हणाला,

"हे बघ आताच्या आता याला निमूट बसायला सांग काय ? आणि मी काय सांगतो ते ऐक. याची शमी दुपारी तिथं तासभर उभी नसती तर हा प्रकार झाला नसता. एवढा वेळ काय करते म्हणून मी तिच्या मागे गेलो काय ! तर....."

"तर काय ?" आज्या म्हणाला.

दिप्या जामच खवळला होता. पुन्हा पुन्हा तेच बडबडत होता. न् आज्याला एकदम चूप बसायला सांग ! असं म्हणत त्यानं बॉम्बशेल टाकलाच !

'ही बघ शमीची चिठ्ठी'.

त्यानं खिशातून चिठ्ठी बाहेर काढली.

आज्या पाक गार ! मी चिठ्ठी घेऊन वाचली. आज्या ती हिसकावणार होता. दिप्यानंही हात घातला. चिठ्ठी टरकली. दिप्यानं कॉलरला धरुन आज्याला टेबलावर खेचला. आज्याचा शर्ट टरकला तरी दिप्यानं त्याला टेबलावर आदळलाच.

मग दिप्या तरातरा निघून गेला. त्याची समजूत घालण्यासाठी म्हणून मी आणि अशफाक तेथून सटकलो.

त्यानंतर दोन-चार महिने सारं शांत होतं. काही दिवसांनी कॉलेजच्या कट्टयावरुन नवीनचं 'टूम' निघाली. दिप्या आणि शमीचं लफडं म्हणे मर्यादेपलिकडे गेलं होतं.

आणि आज्या ......

आज्या चहाचे कप आणि टेबल मोडल्याबद्दलचे दोन हजार कॅन्टिनवाल्याला आणि बेशिस्त वर्तनाबद्दल प्रिन्सिपॉलच्या हुकूमावरुन क्लार्कने फाडलेली पाचशेची रिसीट असे अडीच हजार भरुन हात धरुन बसला होता. त्याला शेवटी 'शमी' मिळाली नाही ते नाहीच.

या सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे या सगळ्या झालझोलात माझा रोल काय ?

भले बहाद्दर ! हीच तर खरी 'अंदर की बात है' !

दिप्या म्हणतो ते खरंच ! 'मुहब्बत करने की ही चीज है'

दिप्याला शमी पटल्याचा सगळा बनाव मीच रचला होता. 'ती अंदर की बात' ही माझीच ! दिप्याला पटवला मी ! ती 'टूम' देखील मीच काढली. एवढं कशाला ती चिठ्ठी ही माझीच होती. यारो, हे तर काहीच नाही. खरी बात तर पुढेच आहे.

शमी चक्क मलाच पटली आहे.

❖ ❖ ❖

# तो अजुनही वेडा झाला नव्हता

- गजानन संकपाळ बी.ए. भाग ३

दूर दूर आकाशात नजर जात होती. पण त्या काळोखात दिसणाऱ्या सोनेरी फुलांचा वेल अजुनही दृष्टीस पडत नव्हता. प्रेमवादळात सापडलेला जॉन अजुनही वेडा झाला नव्हता. तो शोधत होता. आपल्या रीटाला. रीटा एक सुंदर मुलगी आणि जॉन एक साधा भोळा लेखकी विचारांचा मुलगा जॉन आपल्या मित्रांत आनंदी असायचा. अतिशय सुखद जीवन जगणारा जॉन आलं आयुष्य आनंदाने जगत होता. आयुष्याच्या वाटेवर एकादा मोठा पराक्रम करावा आणि जगाला आपली ओळख करुन देण्याचा विचार त्याच्या मनात असायचा. तो एक उत्कृष्ठ असा व्यायामपटूही होता. आपलं शरीर व्यवस्थित आणि आकर्षक बनविण्याची त्याला लहानपणा पासूनच आवड होती. मित्रांसाठी जीवाला जीव देण्याची त्याची तयारी असायची. आपलं तत्वज्ञान तो मित्रांना सांगू लागला की मित्र त्याच्याकडे आश्चर्याने पहायचे. असेच एकदा एका मित्राबरोबर जॉन गप्पा गोष्टी करत असताना त्याला रीटा नावाची मुलगी दिसली. ती अतिशय सुंदर दिसत होती. अर्थातच तिला पाहिल्यावर कुणाचीही नजर तिच्यावर स्थिरावली असती. क्षणभर जॉनही तिच्याकडे पहात राहिला आणि त्यानं आपला मित्र अॅलेकला ही मुलगी तुला कशी वाटते, हिच्याशी प्रेम करावे का ? असा प्रश्न केला. अॅलेकने त्या मुलीची स्तुती करत मुलगी छान असल्याचे सुतोवाच्च केले. आणि जॉनने अॅलेकला सांगितले जर काय मुलीने मागे वळून पाहिले तर या मुलीशी मी प्रेमाचे नाते जुळवीन. ती पुढे पुढे जात होती. अॅलेक आणि जॉन तिच्याकडे मागून पहात होते. ती पुढे गेली आणि तिने मागे वळून पाहिले बस ! जॉनच्या प्रेमाला सुरवात झाली. जॉन आतून बाहेरुन प्रेमाने भारावून गेला.

जॉन नदीकाठी नोकरी करता होता. आणि रीटा नदीला कपडे धुन्याच्या निमित्ताने आली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी नदीकाठी कोवळ्या उन्हात जॉन अभ्यास करत बसला होता. रीटा आदल्या दिवशी भेटलेल्या वेळेलाच धावत पळत आली होती. तिचं पूर्ण लक्ष जॉनकडे होते. तिच्या चेहऱ्यावर आनंदाच्या छटा स्पष्टपणे जाणवत होत्या. जॉनच्या चेहराही तिला पहाताच प्रसन्न झाला होता. अशारितीनं रीटा प्रत्येक दिवशी जॉनला भेटायला कपडे धुण्याच्या निमित्ताने येऊ लागली. जॉनही तिच्यात गुंतू लागला. अभ्यास करतानाही जॉनला तिचा चेहरा दिसू लागला. तिचे ते सोनेरी केस, आणि आतुरतेने जॉनच्या नजरेकडे पाहणारे कमळासारखे नयन जॉनला वेडे करुन जात होते. सर्वत्र हिरवा परिसर, समोरुन वाहणारी नदी, नदीतील लहान लहान तरंग, त्या तरंगाकडे पाहणारा जॉन सर्व कसं अगदी शांत आणि शांत होतं

शनिवारचा दिवस उगवला. आज जॉन रीटाचीच वाट पहात होता. रीटाही ठरल्या वेळेला आली होती. जॉन लव्ह लेटर घेऊन उभा होता. रीटा आली आणि जॉनच्या हातातील लव्ह लेटर घेऊन गेली. ती लेटर घेऊन गेली नव्हती तर जॉनचा जीव आपल्या प्रेमरुपी पिंजऱ्यातून घेऊन गेली होती. जॉन तिच्या प्रेमात चांगलाच गुंतला होता. नदीवरुन येणारा गार वारा जॉनला वेडं करत होता. जॉन दिवस रात्र रीटाचीच स्वप्न पाहू लागला होता. जॉनला स्वत:ची काळजी वाटत नव्हती पण रीटाच्या काळजीत तो गुंतला होता. तिला कोणी त्रास देत असेल का ? ती काय करत असेल ? तिला करमत असेल का ? ती आपली वाट पहात असेल का ? या सारखे असंख्य प्रश्न त्याच्या मनात येत असत.

दिवसामागून दिवस जात होते. जॉन आणि रीटा एकमेकांत चांगलेच गुंतले होते. त्यांना दुनियेचं भान राहिलं नव्हतं. आता जॉनच्या सानिध्यात बरेच मित्र आले होते. प्रत्येकजण आपआपल्या प्रेमाच्या गोष्टी एकमेकांना सांगत होते. आपलं करिअर आपले विचार या सर्वांपासून जॉन दूर गेला होता. जिमी नावाचा एक मित्र त्याचा खास बनला होता. जिमीच्या मैत्रिणीकडून जॉन रीटाला लेटर देत होता. एका लेटरमध्ये त्यानं लिहिलं होतं. 'मी तुझ्या प्रेमात वेडा होईन, तुझ्या गल्लीतून तुझं नाव घेत मी फिरेन तेंव्हा छोटी छोटी मुलं मला वेडा वेडा म्हणून दगड मारतील. मी रक्तानं लाल भडक होईन तेंव्हा तुला ते पहावणार नाही. तू धावत पळत माझ्या आडवी येऊन उभी रहाशील. त्या मुलांना तू सांगू लागशील नका मारु रे त्याला तुम्ही दगड, तो वेडा नाही आहे, तो प्रेमवेडा आहे. मी तेथून दूर निघून जाईन. तिथे पुन्हा मला तुझी आठवण येईल. तेथील लोकांनाही मी तुझ्या विषयी विचारीन, माझी रीटा कशी आहे ? तेही मला वेडा समजतील आणि रस्त्याच्याकडेला असणाऱ्या दगडांवर ढकलून देतील. माझे डोकं जोराने दगडावर आपटेल. डोक्यावरुन रक्त वहायला लागेल. तोंडातून तुझेच नाव बाहेर पडत असेल आणि तेथेच माझा शेवट होईल.'

जॉन रीटावर जीवापाड प्रेम करु लागला होता. सोनेरी उन्हामध्ये उभी असलेली रीटा जॉनला स्वप्नामध्येही दिसायची. हातामध्ये तो आकाशातील तारकापुंज घेऊन तिच्या भेटीसाठी उभा रहायचा. नाजुकशा पाऊलांनी रीटा त्याला भेटायला यायची. तिच्यावर अतिशय उत्साहाने त्या तारका तो शिंपायचा दोघांच्या हसण्याने तो शांत परिसर प्रसन्न बनायचा. पण हे फार काळ चालले नाही. अमृताच्या समुद्रात विषाचा थेंब पडावा आणि संपूर्ण समुद्रच विषारी बनावा तसे दोघांच्या प्रेमाला दृष्ट लागली. दोन-तीन भेटीनंतर रीटाने आपण दुसऱ्या मुलावरती प्रेम करत असल्याची बातमी जॉनचा मित्र जिमीला सांगितली. पण जीवाला जीव देणाऱ्या जिमीला ही बातमी जॉनला कशी सांगावी हे कळेना. अखेर त्याने जॉनच्या सर्व मित्रांना गोळा केले आणि जॉनला ही गोष्ट सांगण्याचा निर्धार केला. सर्व मित्रांनी मिळून जॉनला काही अटी घातल्या. मित्रांचा चेहरा पाहून जॉनला मोठ्या संकटाची जाणीव झाली. आपल्याला एक गोष्ट सांगताना आपले मित्र एवढे दु:खी होतात अशी ती गोष्ट कोणती असेल या विचारात तो होता. मित्रांना ती गोष्ट सांगण्याचे अजुनही धाडस होत नव्हते. पण जॉनचा ती गोष्ट ऐकण्याचे धाडस आणि मनाचा खंबीरपणा पाहून त्यांनी ती गोष्ट जॉनला सांगितली. क्षणभर जॉनला समोरचे काही

दिसेना. डोईवरचे आकाशफाटल्याचा आणे पायाखालची जमीन सरकल्याचा भास झाला. जॉन संपला होता, जॉन बरबाद झाला होता. पण त्यातूनही जॉन सावरला होता. कारण आपलं प्रेम व्यक्त करण्यात जॉन कमी पडला नव्हता. रीटा जॉनचे प्रेम ओळखू शकली नाही. ती जॉनच्या प्रेमाच्या लायकीची राहिली नव्हती. ती क्षुल्लक बनली होती. मोठ्या विचारांचा जॉन हे सर्व चांगल्यारितीने सहन करु शकत होता. कारण तो अजुनही वेडा झाला नव्हता. मात्र जॉन, जॉन राहिला नव्हता आणि रीटा, रीटा राहिली नव्हती.

गार वाऱ्यात उभं राहून आकाशाकडे चमचमणाऱ्या चांदण्याकडे जॉन आजही तासन्तास पहात रहातो. त्यामध्ये आपल्या रीटाचा चेहरा शोधतो, तिचं हसणं शोधतो. पण त्यामध्ये त्याची रीटा त्याला सापडत नाही. त्यावेळी त्याच्या डोळ्यातून नकळत अश्रू बाहेर येतात. ते हिऱ्यासारखे चमकतात आणि गालावरती ओघळतात. जॉन शांतपणे झोपी जातो.

# हसायचं नाही !



## बस

एक वाटसरु : काय हो शेतकरीदादा मला लवकर जायचे आहे. मी जर तुमच्या शेतातून गेलो तर मला १०.०० ची बस मिळेल का ?

शेतकरी : का नाही मिळणार ? माझ्या कुत्र्याने जर तुम्हाला पाहिले तर १० ची काय ९.३० ची सुध्दा बस मिळले.

## साईड

एक वेडा गाणे म्हणत बसलेला होता. ते पाहून नर्सला वाटले याच्यात थोडी सुधारणा झाली आहे. ते दाखवण्यासाठी ती डॉक्टरांना घेऊन आली.

त्यावेळी तो वेडा खाली डोके व वर पाय करुन गाणे म्हणत होता. त्यावर नर्सने त्याला विचारले, "थोड्या वेळापूर्वी तर तू सरळ होतास आत्ताच काय झाले." त्यावर तो वेडा म्हणाला, "तेंव्हा कॅसेटची A साईड चालू होती आता B साईड चालू आहे."

## एटी टू-येती तू

एकदा एका ग्रामीण शाळेची वार्षिक तपासणी सुरु होती. शाळा तपासणीस एका वर्गात आले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या इंग्रजी उच्चाराची परीक्षा घ्यायचे ठरवले. त्यांनी गंपूला उठवले व ते म्हणाले, "बाळ मी चार इंग्रजी अंक म्हणतो ते तू मला म्हणून दाखव. सेवन्टी, एटी टू, एटी नाईन, नाईन्टी नाईन"

त्यावर गंपू म्हणाला, "शेवंती, येती तू, येती नाई, नाई तर नाई."

- अभिजीत पाटील बी.ए. भाग २

# मातृकर्तव्य

- अभिजीत पाटील बी.ए. भाग २

शांताबाईंनी आपल ताट घेतलं. जेवून घ्यावं म्हणून तयारी करु लागल्या. रात्रीचे साडेनऊ वाजले होते. एवढ्यात दाराची कडी वाजली. यावेळी कोण आलं ! हातातलं भांड बाजूला ठेवून त्यांनी दरवाजा उघडला. दारात किरण उभा. भस्सकन दारुचा वास आला. शांताबाईंनी नाकाला पदर लावला व बाजूला झाल्या. किरण आत आला.

"जेवण झालयं ? "

"नाही."

"दोन दिवस काही खाल्लं नाही."

"दारु तेवढी प्यालास"

"धावतोय आई, धावून धावून दमलोय. आता धावायची शक्ती नाही."

"एवढं धावायला कोणी सांगितल होतं ! हातपाय धुऊन घे जेवायला वाढते."

"आलोच, आई"

हातपाय धुऊन किरण पाटावर बसला. शांताबाईंनी स्वत:साठी केलेलं सगळं अन्न त्याला वाढलं अधाशासारखा भसाभसा जेवला. दाढीचे खुंट वाढलेले, केस विस्फारलेले, लाल डोळे, मळके कपडे अशी त्याची अवस्था होती. पिंगट डोळ्यांचा, गोऱ्या वर्णाचा किरण पार काळवंडून गेला होता. जेवण झालं. तो उठला. हात धुतले. शांताबाईंनी आतल्या खोलीत सतरंजी अंथरली. किरण उजव्या हाताची उशी करुन झोपला.

त्याला गाढ झोप लागल्याची शांताबाईंनी खात्री करुन घेतली. दिवे घालवले. दरवाजाला बाहेरुन कडी लावली. कुलूप लावलं. अंधार होता. घाईघाईनं त्या पोलीस चौकीत आल्या. दोन-तीन मिनिटं त्यांना काही बोलता येईना. इन्स्पेक्टरांनी त्यांना बसायला खुर्ची दिली. थोड्या वेळानंतर शांताबाई बोलू लागल्या.

"मी शांताबाई देशमुख. किरण देशमुख, अनेक दरोडे, घरफोडी करणारा आरोपी. त्याची आई आहे मी. गेली कित्येक महिने फरारी होता ना तो आज घरी आला. त्याला कुलूपात बंद करुन आलेय मी. तुमचा गुन्हेगार तुम्ही ताब्यात घ्या" शांताबाईंनी हुंदका आवरला.

"माफ करा बाई मी आपल्याला ओळखलं नाही, मी इथं नवीन आहे. पण तुम्हाला बघून एखाद्या देवीचं दर्शन व्हावं तसं वाटलं. चला म्हादू, जीप काढ." ड्रायव्हर, दोन पोलीस, इन्स्पेक्टर आणि शांताबाई पोलीसांच्या जीपमधून निघाले.

शांताबाईंनी कुलूप काढलं. किरण झोपलेलाच होता. तसाच त्यांनी त्याला पकडला. त्याच्या हातात बेड्या ठोकल्या. किरण शांताबाईकडं बघत बघत गेला. त्याच्या डोळ्यात निखारे फुलले होते.

गाडी गेली. शांताबाई सुन्न झाल्या. किती डोळे वाहिले याला सुमार नाही. शेवटी ग्लानी येऊन झोप आली. झोपेत किरण्याच्या जन्मापासूनचा चित्रपट डोळ्यासमोरुन सरकत गेला.

.....शामराव देशमुख सरकारी खात्यात कारकून होते. नोकरीत कायमं झाल्यावर शांताबाईंशी लग्न झालं. तीन खोल्याचं घर. कायमची नोकरी आणखी काय हवं ! सुखी संसार सुरु झाला. दोन वर्षांनी त्यांच्या संसारात किरण आला. त्याच्या कौतुकात वर्ष कसं गेलं कळलचं नाही. एके दिवशी दारात एक गाडी आली. त्यातून कुलकर्णी आणि फाळके यांनी शामरावांना उचलून आत आणले. शांताबाईच्या मनात धस्स झालं. फाळकेंनी ऑफिसातच हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाल्याचं सांगितलं. शांताबाईच्या जीवनात काळोख पसरला. रडून-रडून डोळे सुकले. मनानं फार खचून गेल्या. आपलंही जीवन संपवावं असं मनात आलं पण किरणकडे बघून थांबल्या.

शामरावांची पाच-सहा वर्षेच नोकरी झाली होती. त्यामुळे पेन्शनचा प्रश्नच नव्हता. पी.एफ. ची थोडी रक्कम मिळाली. आता शांताबाईंना तीन खोल्यांची गरजही नव्हती. एक खोली त्यांनी भाड्यांन दिली. माई म्हणून एक पन्नाशीच्या बाई तिथं राहायला आल्या. मोठी प्रेमळ बाई. शांताबाईंची व त्यांची चांगलीच गट्टी जमली.

लोणची, पापड, कुरड्या असे जिन्नस करणे, चार घरी स्वयंपाक करणे असा उद्योग शांताबाईंनी सुरु केला.

किरण फार हट्टी होता. जाम ऐकत नसे. जवळच्या शाळेत जाऊ लागला. अभ्यासात लक्ष असेतसेच दंगाधोपा जास्त. तो सहावीला असताना शाळेतून 'भेटायला या' असा निरोप आला. किरणने मुलांनी खाऊसाठी आणलेले पैसे चोरले होते. त्यांच्या खिशातच ते सापडले. शांताबाईंनी किरणला बदडला. गॅसवर पळी गरम केली. त्याच्या हाताला चटका देणार तोच माई मधी आल्या.

इतका मार खाऊनही त्याच्या डोळ्यात पाणी नव्हतं. एक वेगळीच चमक होती. हातातली पळी कोपऱ्यात फेकून त्या ओक्साबोक्शी रडू लागल्या. माई बराच वेळ किरणला समजावत होत्या. पण त्याच्या चेहऱ्यावर कोणताही भाव नव्हता.

नववीपर्यंत किरण अट्टल चोर बनला. शांताबाई त्याला मारत. अनेक वेळा त्याच्या दंडाला धरुन बाहेर काढत. सातवीत दोन वर्ष, आठवीत तीन वर्ष असं करत तो नववीत आला होता. नववीच्या वार्षिक परीक्षेच्या वेळी त्यानं सुपरव्हिजनला आलेल्या बाईचीच पर्स चोरली. त्याला शाळेतून काढून टाकण्यात आलं. त्या दिवसापासून शांताबाईंनी त्याच्याशी बोलणचं टाकलं. कधी-कधी आपलं मन त्या माईजवळ मोकळं करीत असत. पुढं-पुढं किरण बाहेर चोऱ्या करु लागला. मधे-मधे आठ-आठ दिवस घरी येत नसे. आल्यावर त्याला जेवायला घालण्यापलिकडे शांताबाई काही करत नसत.

अशीच सहा-सात वर्षे गेली. शांताबाई मनानं खचत गेल्या. जास्तीत जास्त स्वत:ला कामात गुंतवून घेऊ लागल्या. एकट्याच असल्या की शून्यात नजर लावून बसत. किरणच्या चोरी-दरोडेखोरीच्या बातम्या कानी येत. शोधासाठी अनेक वेळा पोलिस घरी येत. शांताबाईंनी

पोलिसांपासून काहीही लपवून ठेवलं नाही. "तो जर घरी आला तर मी स्वत:च तुमच्या स्वाधीन करीन," असं त्या त्यांना सांगत.

एकदा एक मोठा दरोडा पडला. पोलिस पाळतीवर होतेच. मुद्देमालासकट दोघं सापडले. पण त्यांचा म्होरक्या किरण निसटला. वर्तमानपत्रात बातमी होती. अशा बातम्या आता नेहमीच्याच झाल्या होत्या. त्या दरोड्यानंतर आठ-दहा दिवसांनी रात्री किरण घरी आला होता.

..... दरवाजावरची कडी वाजली. शांताबाईंना जाग आली. दरवाजा उघडला. दारात माई उभ्या होत्या. माईंनी शांताबाईंना वाकून, दोन्ही हातांनी त्यांच्या पायाला स्पर्श करुन नमस्कार केला.

"अहो माई, ..... हे काय करताय ?"

"देवीच दर्शन घेतलं मी. एका दुर्गामातेला नमस्कार केला."

"कोणास ठाऊक ! मी कसली दुर्गामाता. मी तर पराभूत माता. माई, माझा साफ पराभव झाला हो. मी हरले. मुलाला ह्यांच्या माघारी घडवू शकले नाही. आता माझी जगायची इच्छाच संपली. पण माई मी मरुन गेल्यावर ह्यांनी किरण बद्दल विचारल्यावर काय सांगू ? माझ्या ह्या-ह्या हातानं पोलिसांच्या ताब्यात दिला ! काय म्हणतील ते ! केवढी स्वप्नं आम्ही दोघांनी पाहिली होती !"

दुसऱ्या दिवशीची पहाट चार वाजलेले शांताबाईंच्या दारात पोलिसगाडी. पोलिसांनी दार वाजवलं. हाका मारल्या. माईही जाग्या झाल्या. त्यांनीही हाका मारल्या आतून प्रतिसाद नाही. शेवटी दरवाजा फोडला. अंथरुणावर शांताबाई पडल्या होत्या. माईजवळ गेल्या शांताबाई या जगात नव्हत्या. त्यांची इहलोकीची यात्रा संपली होती. माईंनी डोळ्याला पदर लावला.

"एक महान माता मातृकर्तव्य करुन गेली."

इन्स्पेक्टरनं डोक्यावरची कॅप काढली. व माईंना म्हणाले, "किरण देशमुखनं काल रात्री पळून जायचा प्रयत्न केला. उंच भितीवरुन उडी मारताना तो दगडावर पडला आणि त्यावेळी तो गेला. हे सांगायला आम्ही इथं आलो होतो पण..... ?"

# आपण काय करु इच्छिता ?

पोहू इच्छिता ? - मग ज्ञानसागरात पोहा.

चालू इच्छिता ? - मग सन्मार्गावर चाला.

गाऊ इच्छिता ? - मग थोरांचे गुण गा.

बोलू इच्छिता ? - मग गोड बोला.

घेऊ इच्छिता ? - मग सद्गुण घ्या.

टाकू इच्छिता ? - मग दुर्गुण टाका.

आठवू इच्छिता ? - मग थोरांचे कार्य आठवा.

काही करु इच्छिता ? - मग देशकार्य करा.

गिळू इच्छिता ? - मग राग गिळा.

- **कु. कोमल पाटील** बी.ए. भाग २

# दिलासा

- कु. निता पाटील बी.ए.भाग ३

कुसुमचं वय जेमतेम पंचेचाळीस असेल. ताप आला म्हणून दवाखान्यांत आलेली. पहाताक्षणीच तिचं वैधव्य लक्षात आले. मी एक बी. ए. च्या वर्गात शिकणारी तरुणी त्याचबरोबर दवाखान्यात रिसेप्शनीस्ट म्हणून काम करताना प्रत्येक पेशंटची नोंद करणं माझं काम असतं. केस पेपर घेऊन पेशंट डॉक्टरांच्या केबीनमध्ये जाऊन तपासणी झालेवर, माझ्या कानावर डॉक्टरांचे प्रश्न व पेशंटची उत्तरे नेहमीच ऐकायला येतात. पण आजचा संवाद थोडा वेगळाच वाटल्याने मी लक्ष केंद्रीत करुन ऐकत होते.

कुसुम केबीनमध्ये खिन्न मनाने डॉक्टरांना काही तरी सांगत होती.

डॉक्टर :- काय होतय.

कुसुम :- ताप येतोय.

डॉक्टर :- किती दिवस

कुसुम :- ८ ते १० दिवस

डॉक्टर :- औषध काय घेतल होत का ?

कुसुम :- होय, पण गुण आला नाही.

वैधव्य लक्षात आल्याने डॉक्टरानी फॅमिली हिस्ट्री विचारली.

आपले मिस्टर ? .... डॉक्टरांचे वाक्य पूर्ण व्हायचे आतच कुसुमने एक जोराचा हुंदका दिला. आणि म्हणाली, "डॉक्टर जगण्यात अर्थ नाही. आत्महत्या करावी असाच विचार मनात येतोय. पण...." ती बोलताना थोडी थांबली. "हे बघा, तुम्ही माझ्या मुली सारख्या मनातल सगळ सांगा. मन हलक होईल." डॉक्टर हळूवार बोलले .....

कुसुमनं सांगायला सुरुवात केली, "मला दोन मुलं. मुलगी बारावीमध्ये शिकते. मुलगा दहावीला आहे. घर फक्त मालकीच आहे. रोजगार करुन नवरा बायको सुखात होतो. पण आकस्मित न ऐकावे ते ऐकले आणि म्हणूनच आत्महत्तेचा विचार मनात येतोय नवऱ्याला हॉस्पिटलमध्ये ताप, खोकला, अशक्तपणा व सारखे शौचास होत होते म्हणून दाखल केले होते. सलाईनही चालू होते. इतक्यात त्यांच्या रक्ताचे रिपोर्ट डॉक्टरांचेकडे कुणीतरी दिले. डॉक्टरानी ते कागद पाहिले ताबडतोब कंपौडरला बोलाऊन सांगितले. सलाईन बंद करा आणि मला सांगितले झालेले बील भागवून पेशंटला घरी घेऊन जा. आमच्याकडे काय कुठेही उपचाराने न बरा होणारा आजार आहे. मी म्हटलं 'कॅन्सर' आहे का ?" "नाही." डॉक्टर खुर्चीवरुन उठता उठताच म्हणाले **"एड्स"** झालाय !

अंगावर दरदरुन घाम आला. हृदयाचे ठोके वाढले. डोळ्यापुढे अंधारी येऊ लागली. "आई...." मुलानं बाहेरुन हाक मारली. मी भानावर आले. स्वत:ला सावरलं आणि पेशंटला घरी आणलं. हा हा म्हणता गावभर झालं. पेशंट काही जगणार नाही पण कुणीही घराकडे येऊन ढुंकूनही पाहिलं नाही. मीच पेशंटची सेवा करीत होते. चमचा चमचा पाणी तोंडात घालीत होते. मध्येच त्यांनी हात वर करुन

एक लांबलचक सुस्कारा टाकला व म्हणाले, "माझं चुकलं" आणि 'आम्ही पोरके झालो.'

"हे बघा कुसुम माझ्या सारं लक्षात आलं आहे. काही घाबरु नका. आज मी आपणाला औषध देतो. उद्या परत मुलासह तुम्ही या. जा तुम्ही !" डॉक्टर म्हणाले.

दुसऱ्या दिवशी कुसुम मुलासह आली. पहिल्या दिवशीच्या माहितीवर डॉक्टरांनी कालच रक्त तपासणीला दिले होते. त्याचा रिपोर्ट आलेला होता. डॉक्टरांनी कुसुमला केबिनमध्ये बोलविले. रिपोर्ट पाहिला. एक मिनिट स्तब्ध झाले व म्हणाले "मुलांच्याही रक्ताची तपासणी करु."

त्यांच्या रक्ताच्या चाचण्या तपासणी केली. सर्व रिपोर्ट डॉक्टरांच्याकडे आले. दुसऱ्या दिवशी कुसुमही आली. एखाद्या विद्यार्थ्याला परीक्षेच्या निकालाची माहिती मिळताना जी मानसिक स्थिती असते. त्याच अवस्थेत कुसुम मनात ठरवत होती. मला जर नवऱ्याचा आजार असेल तर जगण्यात अर्थ नाही. 'आत्महत्या'हाच पर्याय. असा तिच्या मनात विचार असतानाच डॉक्टर म्हणाले,

"हे बघा, कुसुमताई आपल्याला आजार नसेल तर कसे वाटेल ?" नकारात्मक वाक्यातून पेशंटची मानसिकता तपासण्याकरीता डॉक्टर बोलत होते.

नवऱ्याचा आजार मला व मुलांना नसेल तर देवाचेच आभार मानायला हवेत.

"समजा, याच्या उलट रिपोर्ट, आजार झाला आहे म्हणून आला तर ?" डॉक्टर पुढे बोलायच्या आत "आत्महत्या हाच मार्ग" कुसुम गांभीर्याने बोलून गेली. डॉक्टरांनी तिची मानसिकता ओळखली व म्हणाले,

"हे पहा, कधी तरी प्रत्येकाला मरायचच असतं. पण कोण कसे मरतो याची चर्चा मागे राहते. मेल्यावर चांगलं काम व आत्मा एवढेच अमर असते. स्वत:साठी जगणं हे नैसर्गिक आहे पण दुसऱ्यासाठी जगण हे कर्तव्य आहे आणि त्याच समाधानही वेगळं आहे. असो "

"तुला तसचं मुलांच्यासाठी जगावं लागेल. मुलंही आईवडिलांची प्रतिके असतात. तेंव्हा आत्महत्या हे भ्याडपणाचे लक्षण आहे. तू काही घाबरु नकोस. मुलांना कुठल्याही प्रकारची बाधा नाही असा रिपोर्ट आला आहे." कुसुमच्या चेहऱ्यावरील चिंताग्रस्त भावामध्ये एक नकळत आनंदाची लहर दिसली. डॉक्टरचे, देवाचे आभार मानावे तेवढे थोडच. मला जरी 'एडस्' असेल तरी मी निकराने जगण्याचा प्रयत्न करीन. तुम्ही मला औषधपाणी, पथ्यपाणी व मुलांनाही 'एडस्' याची कल्पना देऊन आम्हाला आमचे आयुष्य वाढविण्यास मदत करा. मी आत्महत्येचा विचार मुलाकरीता काढून टाकून नव्या जोमाने जगू इच्छिते.

डॉक्टरांनी मुलांनाही बोलावून घेतलं व त्यांना एडस्बद्दल पूर्ण माहिती दिली ती अशी -

**AIDS** - ह्या चार अक्षरांनी साऱ्या जगाला भिती दाखविली आहे.

A - (ए) Acquined (जन्मानंतर प्राप्त झालेला)
I - (आय्) Immune (प्रतिकार शक्ती)
D - (डी) Definciency (कमतरता)
S - (एस्) Syndnome (लक्षण समुचय)

ज्या विषाणूमुळे व्हायरस आजार होतो त्याचं नाव आहे. एच. आय. व्ही. (HIV)

H - (एच) ह्यूमन (मानवी)
I - (आय) इम्युनो (प्रतिकार शक्ती)
V - (व्ही) व्हायरस (विषाणू)

**लागण :-**

एडसग्रस्त व्यक्तिशी असुरक्षित संबध.
एडसग्रस्त व्यक्तिच्या रक्ताचा वापर.
एडसग्रस्त व्यक्तिस वापरलेली दुषित सुईचा वापर.
एडसग्रस्त दांपत्याच्यापोटी जन्माला येणाऱ्या मुलास

जन्मजात लागण झाल्यामुळे या रोगाची ५ ते ८ वर्षात लक्षणे दिसू लागतात. तोपर्यंत एड्सग्रस्त व्यक्ति वाहक (Carier) म्हणून राहते व त्या व्यक्तिच्या शरीर संबंधात येणाऱ्यांना रोगाची लागण होते.

**लक्षणे :-**

१) एक महिन्यापेक्षा अधिक काळ ताप येणे, घाम येणे, पायातील ताकद कमी होणे, वारंवार जुलाब होणे.

२) कातडी रोग होणे.

३) तोंड येणे, तोंडात चट्टे पडणे.

४) शरीरात लसिकाग्रंथी वाढणे.

५) पर्यायाने १० टक्के वजन घटणे.

**निदान :-**

'एड्स' चे निदान सरकारी हॉस्पिटलमध्ये इलायझा टेस्टने मोफत केले जाते.

संबंधीत व्यक्तिचे नाव गुप्त ठेवले जाते व निष्कर्षही गुप्त ठेवले जातात.

राष्ट्रीय विषाणू संस्था, पुणे किंवा इम्युनो रिमॅटोलॉजी संस्था, मुंबई येथे वेस्टर्न ब्लॉट टेस्ट केली जाते.

एड्सग्रस्ताने संभोग टाळावा. आवश्यकता असल्यास निरोध वापरावा. रक्तदान, वीर्यदान करु नये. स्त्रिरुग्णांनी गर्भधारणा होऊ देऊ नये. झाल्यास गर्भपात करावा. सकस आहार घ्यावा. अतिकाम टाळावे. चिकित्सेकरिता योग्य तज्ञ डॉक्टरकडून उपचार करुन घ्यावेत.

**'एड्स'** खालील कारणाने होत नाही -

१) अन्न, पाणी, हवेद्वारे प्रसार होत नाही.

२) खोकला, शिंक

३) सहवास, हस्तांदोलन, अलिंगण, चुंबन

४) डास, ढेकूण चावल्याने

५) ताट, वाटी, तांब्या, भांडी यांचा वापर केल्याने एड्स संसर्ग होत नाही.

**'एड्सचा'** प्रसार कसा टाळता येईल -

१) दुषित सुई, सिरिंजचा वापर होऊ देऊ नये.

२) रक्त स्विकारावे लागल्यास अधिकृत पेढीतून रक्त घ्यावे.

३) केशकर्तनालयात सुध्दा नविन ब्लेडचा आग्रह धरावा.

४) एक पत्नीवृत पाळावे.

५) एड्सग्रस्त स्त्रियांनी गर्भ धारणा टाळावी.

कुसुम तुला तुझे पती वारल्यावर सामाजिक बहिष्काराचा अनुभव आला आहे. एड्सग्रस्त याचे कुटूंब सामाजिक बहिष्कारापासून वाचवणे आपले कर्तव्य आहे. मृत्यू इतर आजारात व अपघातात येतो. तेंव्हा मनोबल खचू न देणे हे आपले कर्तव्य आहे. एड्सला लस नाही. उपचार नाही. सध्या प्रतिकार शक्ती वाढविण्याचे प्रयोग सुरु आहेत. तरी कुठल्याही प्रकारचा उपचार नसल्याने एड्सग्रस्त म्हणजेच मृत्यू असे जरी म्हटले असले तरी एड्सग्रस्त रुग्णाचे आयुष्य आहार विहार संतुलन नित्यांच्या आजाराना वेळेवर औषध उपचार यामुळे एड्स लागण झालेपासून मृत्यू पर्यंतचा जो कालवधी आहे तो निश्चित वाढवता येईल.

तेंव्हा डॉक्टराच्या सल्ला प्रमाणे एड्सपासून निर्भयपणे जगण्यासाठी कुसुमची मानसिकता तयार झाली. उपद्रवावर योग्य उपचार केल्याने ती नित्याची काम ही करु लागली. तिच्यामध्ये सामाजिक बहिष्काराला विरोध करणारी शक्ती निर्माण झाली. रोजगारातून मिळणारा पैसा, मनोबल, जगण्याची धडपड व डॉक्टराचा सल्ला यातूनच तिला प्रेरणा मिळत गेली. आपले अस्थिर कुटूंब स्थिर करु शकली. त्यातूनच एका भयंकर आजारावर ती मात करु शकली.

म्हणून एड्सलाही समर्थपणे प्रतिकार करण्यासाठी स्वत: मध्ये मानसिकता तयार करणे जास्त गरजेचे आहे. त्याचबरोबर सुसह्य जीवन जगत इतरांनाही मार्गदर्शन करीत '**दिलासा**' देत राहणे. हाच खरा 'एड्स' वर उपाय आहे.

❖ ❖ ❖

# प्रतिसूर्य

- विजय देसाई बी.एस्सी भाग ३



भारत भूमीच्या हृदयातून,
त्याचा जन्म झाला.
आणि सुर्योदय व्हावा तशी
भारत भूमी स्वयंतेजाने चमकु लागली.
त्याच्या अस्तित्वाच्या
पहिल्याच दिवशी
अवकाशाने त्याला प्रश्न विचारला
कोण आहेस तू ?
ठाम विश्वासानं तो म्हणाला.....
मी भारतीय आहे.....
आणि या सुर्यासारखा स्वयंप्रकाशीत.....
स्वयंभू आहे....
त्याच्या या उत्तराने अवकाशही
नतमस्तक झालं.
भारतीय पुत्राने, प्रतिसुर्यानं केलेला
हा त्याचा आणखी एक पराभव होता.....!

स्वयंप्रकाशीत, स्वंयभू असणारा, अवकाशालाही शरण यायला लावणारा, तरीही 'माणूस' असणारा कोण आहे हा प्रतिसुर्य ?

या प्रतिसुर्याचे नाव आहे **डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम दि. २५ जुलै २००२** या दिवशी स्वतंत्र भारताचे बारावे राष्ट्रपती म्हणून 'मिसाईल मॅन' डॉ. कलाम यानी शपथ ग्रहण केली आणि एक नवा चैतन्यदायी सुर्योदय झाला. हे नुसते शब्द नाहीत तर हे त्यांच्या प्रत्येक कृतीतून आणि आजही त्यांच्यात असलेल्या प्रंचड इच्छाशक्तीतून दिसू येतं.

मलुल झालेल्या पंखात नवं बळं देण्याची, मेलेल्या, मरगळलेल्या शरीरात प्राण फुंकण्याची, घनघोर संकटातही प्रकाशाचा मार्ग धरण्याची, निराशेच्या खोल गर्तेत असतानाही सुर्याचा प्रखर प्रकाश पेरण्याची, आकाशभरारी घेण्याची शक्ती या मानवाच्या जीवनप्रवाहात आहे. मध्यमवर्गीय घरातला मुलगा ते भारताचा प्रथम नागरिक या पदापर्यंत झालेला त्यांचा प्रवास आमच्यासारख्या तरुणांना प्रेरणादायी आहे.

पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न आणि सन्माननीय राष्ट्रपती असा जीवनप्रवाहाचा चढता आलेख पाहताना त्यांच्यात असणारी अतीव विनयशीलता, प्रत्येक भारतीयाबद्दल असणारी सह्दयता आश्र्चयचकीत करुन टाकते. डॉ. कलाम म्हणतात, "कोणासाठी 'रोल मॉडेल' बनू शकेन या भ्रमात मी नाही, पण अंधारात चाचपडत असणाऱ्या काही होतकरु तरुणांना माझ्या कृतीतून आशेचा, सांत्वनाचा, प्रकाशाचा, प्रेरणेचा अंधूक धागा मिळाला तरी पावलापुरता उजेड त्यांना मिळेल. पुढे पडलेले हेच एक पाऊल नंतर कदाचीत प्रगतीच्या अत्युच्य शिखरावरही जाईल......"

किती विश्वास आहे आम्हा तरुणांवर या 'महामानवाचा'. स्फोटकांच्या 'विधायक' साठ्यानं ओत प्रोत, खचाखच भरलेली कोवळी

बालकं आणि तरुणांच्या सामर्थ्यावर विश्वास असलेला, त्यांच्या साथीनं बलशाली भारताचं स्वप्न पाहणारा हा प्रतिसुर्य यशाचं सुत्र सागताना म्हणतो "स्वप्न पहा, ती मनात रुजवा, आणि प्रत्यक्षात आणा.... तुम्हाला जर काळाच्या किनाऱ्यावर पाऊलखुणा उमटवायच्या असतील तर फरफटत चालू नका."

किती सोप्या भाषेत यशस्वी जीवनाच सूत्र सांगितलयं आपल्या प्रिय राष्ट्रपतीजींनी तडफदार मुलांची फौज घेऊन स्वप्नांवर स्वार व्हा असं सांगणाऱ्या या 'महामानवाला'..... त्यांच्या 'कर्तृत्वाला' ..... त्यांच्यातील 'तडफदारपणाला' ......, त्यांच्या 'धडाडीला' ....., भारताला विकसित राष्ट्रांच्या यादीत नेऊन बसवू पाहणाऱ्या त्यांच्या 'आत्मविश्वासाला' ......., त्यांच्यातील प्रत्येकाबद्दल असणाऱ्या 'आत्मीयतेला'....., त्यांच्या आमच्यावर असणाऱ्या 'विश्वासाला'......, त्यांच्यातील तरल 'कवी मनाला' ......, त्यांच्या 'राष्ट्रप्रेमाला' व कधीही हार न मानण्याच्या त्यांच्या 'लढाऊ बाण्याला'.....

माझे हे शब्दरुपी प्रणाम !..... आणि शब्दरुपी भेट !!

❖ ❖

# जीवन मुल्य

*मी इयत्ता चौथीत शिकत असतानाची गोष्ट. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आम्ही प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थी स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आमच्या शाळेतील ध्वजवंदनाचा कार्यक्रम आटोपून माध्यमिक शाळेत ध्वजवंदनासाठी जमलो. ध्वजवंदनाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर थोड्याच वेळात काही शिक्षकांच्या भाषणाचा कार्यक्रम होणार होता. त्यासाठी सर्व शिक्षक विद्यार्थ्यांसमोर खुर्चीवर बसले. परंतु आमच्या बाई मात्र दहावीच्या विद्यार्थीनीच्या रांगेत बसल्या. बाईंनाखाली बसलेले पाहून मला खूप राग आला. कार्यक्रम झाल्यानंतर ही गोष्ट मी आमच्या वर्गशिक्षकांना विचारली. माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी असे का केले ? तेंव्हा आमच्या वर्ग शिक्षकांनी सांगितले की त्या बाईचे पती हे त्यांच्या माध्यमिक शाळेत शिपायाची नोकरी करीत होते. तर बाई प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या. नवऱ्याने खुर्ची टाकायची आणि बायकोने खुर्चीवर बसायचे हे आपल्या संस्कृतीत बसत नाही. बाईंनी त्यांच्या कृतीने बरोबरीने जगायला शिकविले. दुसऱ्याला तुच्छ लेखायला नाही शिकवले.*

**- अमर कुंभार** बी. एस्सी भाग २

# मृत्यूंजयकार शिवाजीराव सावंत

- धनश्री मुळीक बी.एस्सी. भाग ३



या जगात खूप महान व्यक्ती होऊन गेल्या आहेत आणि होत्या असं म्हणावं लागेल. त्यांच्या गौरवामध्ये त्यांना हिऱ्यांची जरी उपमा दिली तरी ती कमीच वाटेल. पण नियतीच्या खेळापुढे काही कुणाचे चालत नाही. कारण २००२ या वर्षात शिवाजीराव सावंतासारखे मृत्यूंजयकार, वसंत बापटांसारखे कवी, प्रिया तेंडुलकरांसारखी अभिनेत्री अशी माणसं काळाच्या पडद्याआड गेली.

त्यापैकी एक -

आजऱ्याचा तू मृत्यूंजय<br>
कोल्हापूरचा तू छावा<br>
पुण्याचा तू युगंधर<br>
मनापासूनी आहे खरोखर<br>
आंबोलीचा जिवंत झरा<br>
शीरपेचातील एक हिरा

म्हणजे साहित्यशारदेचा छावा **"शिवाजीराव सावंत"**

शिवाजीराव सावंताना मी पाहिले नाही किंवा भेटलेही नाही पण त्यांच्या साहित्याशी काहीशी जोडली गेले. काही दिवसांनी त्यांना पाहण्याची अनमोल संधी मला मिळणार होती. पण ते नियतीला मान्य नसेल म्हणा. यावर्षीच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ते होणार होते. पण नियतीने १८ सप्टेंबर २००२ या कालदिनी घाला घातला आणि शिवाजीराव सावंतासारखा मोती सागरतळाला गेला जो आता कोणाच्याही हाती लागणार नाही.

डोंगराच्या रांगामध्ये लपलेलं, कॉलिफॉर्नियातील एखादा निसर्ग सुंदर नयनमनोहर स्पॉट असावा, तस आंबोली घाटाच्या अलिकडील आजरा गाव आणि आजऱ्याच्या निसर्गकुशीत जन्मलेला हा 'साहित्यशारदेचा छावा' पुण्याच्या पर्वतीजवळ निवासस्थान करुन असलेला असा 'युगंधर' म्हणण्यासारखा लोकोत्तर शिरोमणी आज आपल्यात नाही ही घटना सत्य वाटत नाही पण मानावे लागेल आणि म्हणावं लागेल.

नाव कोठले ? गाव कोठले ? सूर्यपरी झाला,<br>
रणभूमीवर मृत्यंजय जणू शूरवीर ठरला.

आपल्या महाराष्ट्राचा, आपल्या आजरा गावाचा अभिमान असलेला असा हा मराठमोळा मावळा नाहीसा झाल्यामुळे पर्वाचे म्हणजेच २ जानेवारी २००३ ला झालेले साहित्य संमेलन निर्धार ठरले. त्याला एक निर्धार साहित्य संमेलन असे नावच पडले. आणि ते त्रिकाल सत्यच आहे.

हिरण्यकेशीचा गळा दाटला, रामतीर्थही सूना वाटला, पूर्ण फुलेही अश्रू ढाळती, कुणास काहीही नाही कळती, कुशीत तुझ्या गे जन्म घेतला, अंगाखांद्यावर खेळला, तूच तुझ्या कुशीत घेतला हा आमुचा राव. माझा कुठे लपला छावा ! युग पुरुष तो युंगधर झाला !!

त्या साहित्यसम्राटाला माझा मनस्वी शतशः प्रणाम ! शतशः प्रणाम !!

शिवाजीराव सावंतासारखी ब्रम्हकमळे पुन्हा पुन्हा या धरतीवरती जन्माला यावीत हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

❖ ❖ ❖

# साहित्यशारदेच्या कंठातील कौस्तुभमणी पु. ल. देशपांडे

- विक्रमसिंह पाटील बी.ए. भाग २



श्रीमंतीपासून गरिबापर्यंत आणि अशिक्षितापासून उच्चशिक्षितापर्यंत सर्वांना एकत्र जोडण्याची क्षमता असलेले वाङ:मय निर्माण करणारे माणसाच्या स्वभावाचे सूक्ष्म अवलोकन करुन तुम्हा आम्हाला, सर्वांना भावणाऱ्या आणि दीर्घकाळ स्मरणात राहणाऱ्या व्यक्ति आणि वल्ली निर्माण करणारे तसेच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवणारे, आपल्या विनोदी लेखनांनी अनेक पिढ्यांना हसवले आणि हसवता-हसवता आत्मपरीक्षण करायला लावले असे प्रतिभावान साहित्यिक म्हणजे पु. ल. देशपांडे. ज्यांचे नाव उच्चारताना ज्यांच्या मनात निर्मळ आनंदाच्या लहरी उमटवणार नाहीत असा एकही मराठी माणूस सापडणार नाही. साहित्यक्षेत्रात स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा शुध्द नितळपणा कायम ठेवून सखोल चिंतनाने मानवी मनाचा तळ शोधणारे पु. ल. म्हणजे तळ आणि नितळपणाचा आदर्श होय. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलीनंतर मराठी माणसाच्या मनामनात अधिराज्य गाजवणारा अधिपती होय. 'अर्थ बोलाची वाट पाहे' या ज्ञानेश्वराच्या वचनाप्रमाणे प्रथम पु. लं. चे शब्द बाहेर पडत. त्यावर अर्थाचे फुलोरे फुलत. प्रज्ञा प्रतिभा, चारित्र्य व अनुभूती यातून जन्मास आलेले पु. लं. चे साहित्य म्हणजे महाराष्ट्राचे लोकधन आहे. वर्तमान वास्तवाला भविष्यकालीन संकल्पनेची जोड देऊन कल्पनेला वास्तवात मांडणारा हा साहित्यिक सामान्यापासून असामान्यापर्यंत लोकाभिमुख ठरला होता. म्हणूनच पु. लं. म्हणजेचे महाराष्ट्राचे लोकवैभव म्हणता येईल. पु. ल. म्हणजे एक अजातशत्रू व्यक्तिमत्व महाराष्ट्राची साहित्येक आणि सांस्कृतिक भूमी संपन्न करणारी संजीवनी, मन प्रसन्न करणारी एक सिध्दी माणसाच्या दु:खाबद्दलची अपार करुणा घेऊन अवतरलेली लेखणी, मराठी मनाला हलके-हलके गोंजारताना त्यातील कमतरता आणि दोषांवर मिष्किलपणाने भाष्य करणारे एक समृध्द मन होय.

पु. ल. देशपांडे यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९१९ या दिवशी झाला. मराठी जनमाणसात एक आगळं-वेगळं आदराचं स्थान असणारं पु.लं.चं व्यक्तिमत्व अष्टपैलू होतं. नाट्य-चित्रपट, अभिनय पटू, नाट्य चित्रपट लेखक, दिग्दर्शक, कवी, संगीतकार, विनोदी व इतर साहित्यलेखक, उत्तम वक्ता, समाजकार्यकर्ता यापैकी त्यांचा प्रत्येक पैलू टवटवीत व तजेलदार आहे. विसाव्या शतकात महाराष्ट्राला लाभलेली अनुपम देणगी असं त्यांच्या

बाबतीत म्हणता येईल. नाटक व संगीत हे त्यांचं पहिलं प्रेम होतं. त्यांनी अभिनय, नाट्यलेखन व संगीत रचनाकार या भूमिकेतून दिलेलं योगदान भरघोस स्वरुपाचे आहे. १९४८ साली 'तुका म्हणे आता' हे त्यांचं पहिलं नाटक रंगभूमीवर आलं. ते फार यशस्वी झालं नाही मात्र त्यांचं दुसरं 'अंमलदार,' हे नाटक खूप यशस्वी झालं.

पु. लं. ची नाट्य संपदा म्हणजे 'तुका म्हणे आता,' 'अंमलदार,' 'सुंदर मी होणार,' 'तुज आहे तुजपाशी,' 'भाग्यवान,' 'पहिला राजा,' 'तीन पैशाचा तमाशा,' 'एक झुंज वाऱ्याशी,' 'ती फुलराणी' ही आहे. पु. लं. चा पिंड हा समाजवादी चळवळीत घडला असल्याने मानवी जीवनातील मूल्य व निष्ठा जपण्यासाठी माणसाला करावी लागणारी पराकाष्ठा हे त्यांचे जीवनसूत्र होते. ते त्यांनी आपल्या प्रत्येक नाटकात प्रभावीपणे मांडले आहे. आचार-विचार, लेखन, वाचन, स्वातंत्र्य हे माणसाचे मूलभूत अधिकार आहेत. यावर त्यांची जाज्वल्यनिष्ठा होती. 'बटाट्याची चाळ' व 'असा मी असामी' हे पु. ल चे एकपात्री प्रयोग म्हणजे रंगभूमीला मिळालेले खास वरदानच आहे. रंगभूमीला पु. लं. नी दिलेली अनुपम भेट आहे. या प्रयोग सादरीकरणात लेखक श्रेष्ठ की कलाकार श्रेष्ठ ? असा संभ्रम जाणकारांना पडावा अशी अनोखी पेशकश पु. लं. ची असे. 'वाऱ्यावरची वरात' हे मुक्त नाट्य म्हणजे पु. लं. च्या भाषा वैभवाचा व अभिनय कौशल्याचा मनोरम साक्षात्कारच होता. वास्तविक प्रवासवर्णने ही कंटाळवाणी होतात. पण पु. ल याला अपवाद आहेत. कारण 'अपूर्वाई,' 'पूर्वरंग,' ही प्रवासवर्णने वाचून कधी संपतात ते कळतच नाही.

असं हे महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्व १२ जून २००० रोजी दुपारी १.२२ वा. काळाच्या पडद्याआड गेलं आणि साहित्यशारदेच्या कंठातील कौस्तुभमणीचं जणू निखळला.

❖ ❖ ❖

# जीवनातील तत्वे

संशय हा माणसाचा शत्रू आहे.
आणि गैरसमज हा त्याचा सोबती आहे.

जीवनात कांही चुका मुक्तपणे सहण करायच्या असतात. त्यापैकी एक म्हणजे गमावलेलं प्रेम.

मानवाला आयुष्यात प्रत्येक गोष्ट मिळत असते फक्त वेळेवर मिळत नाही. हेच मानवाचे दुःख आहे.

जीवन आणि मृत्यू यामधील संबंध शोधण्यापेक्षा समोर येईल त्याचा आनंदाने स्विकार करावा.

जगात नात्याच्या प्रेमापेक्षा प्रेमाची नाती अधिक विस्मरणीय असतात.

खरोखर प्रेम करणारी मनं ही कधी वासनेची शिकार बनत नाहीत।

**- सुनिल चौगले** बी.ए.भाग २

# आम्ही आमचे 'आदर्श 'शोधतोय

- कु. सरीता पाटील बी.एससी भाग ३

"हल्लीची तरुणायी एकदम बिघडली आहे हो "........

कॉलेजमध्ये दंगा काय करतात... गाड्या काय हाणतात. आजकालच्या मुला-मुलींना वळणच नाही......

अशी आजच्या तरुण पिढीचे अवमूल्यन करणारी विधाने नेहमी आपल्याला ऐकायला मिळतात. परंतु आजच्या तरुण पिढीबाबत अशी विधान करणाऱ्यांनी (महाभागांनी) कधी असा विचार केला आहे का, की आपण आजच्या तरुणांची पुढे काय आदर्श ठेवला आहे ? किंवा आपण आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे काय ?

मुलांवर संस्कार फार महत्वाचे असतात. कारण हेच संस्कार उद्याची 'आदर्श' तरुण पिढी निर्माण करत असते. त्यासाठी आपण आधी 'आदर्श' असणं महत्वाचं असतं. वेळ आल्यावर दुसऱ्याला सहकार्य करण्याची भावना, ही काही जन्मजात मिळणारी देणगी नाही. त्यासाठी मुलांवर तसे संस्कार करावे लागतात. आजची मुलं-मुली कुणालाही सहकार्य करत नाहीत. मदत करत नाहीत असं म्हटलं जातं. पण तेवढे स्वातंत्र्य आपण त्यांना दिले आहे का ? याचा विचार कधी कोण करीत नाही, उलट एखाद्या तरुण किंवा तरुणी मध्येच बोलली किंवा विरोध केला तर एरवी तरुणाईला मठ्ठ म्हणणारे लेक्चर्स देतात की, काय अडले होते मध्ये पडायचे ? तुम्ही काय समाजसेवेचे व्रत हाती घेतलयं ? काय गरज होती भानगडीत नाक खुपसायली ? ....... मग आम्ही तुमच्याकडून कसला आदर्श घ्यायचा ?

कधी-कधी असं होतं इतरांना मदत केली जाते. मात्र ती जगाच्या लाजेनं घाबरुन केलेली असते आणि त्यामुळेच ती अर्धवट असते. मग त्याला काहीच अर्थ नाही.

जुनी माणसं म्हणतात की, "भारतीय तरुणांचा इतिहास हा अत्यंत चैतन्यमय आहे. स्वातंत्र्यासाठी सांडलेल्या तरुण रक्तात येथील मातीने स्नान केले आहे." पण तेंव्हा परिस्थिती वेगळी होती. झाशीच्या राणीच्या पुत्राने आपल्या शूर मातेला लढताना त्याच्या डोळ्यांनी पाहिले होते...... शहीद भगतसिंग बरोबर त्याच्या आईने सुध्दा 'इन्कलाब झिंदाबाद' चा नारा दिला होता. त्यामुळेच भगतसिंग हसत-हसत फासावर चढला. ते सर्व देश प्रेमाचे संस्कार होते. भगतसिंग, चाफेकर यांच्या अगोदरच्या पिढीने त्यांच्यासमोर प्रखर राष्ट्रप्रेमाचा, राष्ट्रकार्याचा आदर्श घालून दिला होता. "जे जे आपल्याकडे आहे त्यातील थोडे तरी दीनदुबळ्यांना द्यावे." असे संस्कार देणारी श्यामची आई त्या काळी होऊन गेली. पण आज उलट आहे. त्या झोपडपट्टीतल्या गरीब, घाणेरड्या मुलांनाबरोबर कशाला खेळतोस ? असे आजच्या मुलांच्या कानावर पडते आहे. आणि हाच फरक आहे तेंव्हाच्या आणि आताच्या

कालामधला !

आमच्या मागच्या पिढीने कसले संस्कार केले आमच्यावर ? भ्रष्टाचार, जाळपोळ, दंगल यापेक्षा वेगळं काय दिलं.... काय दाखवलं आम्हाला. आम्ही आदर्श कुणाचा घ्यायचा ? या भ्रष्ट नेत्यांचा जे देशाला लुबाडत आहेत, गरीबांना फसवत आहेत त्यांचा.... की लाच खाणाऱ्या आजच्या अधिकाऱ्यांचा.... की रस्त्यावर पाव विकून आपल्या चिल्यापिल्यांचे पोट भरणाऱ्या गरीब लोकांना आपल्या गाडीखाली चिरडून मारणाऱ्या अभिनेत्यांचा. कारण समाजातील प्रभावी मंडळींचाच, प्रतिष्ठीतांचाच आदर्श घेतला जातो. तिच जर अशी वागत असतील तर आदर्श, जाणीव, तत्वनिष्ठा या सर्व गोष्टींचा जाब तरुणाईला विचारण्यापूर्वी यांना विचारा....

खून, खंडणी, दंगल हे सर्व राजकारणावरुन जास्त होते हे सर्व जनतेला माहित आहे. मग याला आम्ही जबाबदार ! आम्ही जबाबदार आहोत की कडक पांढऱ्या खादीतील ही मोठी मंडळी ? जरा विचार करा. आम्ही फक्त वर्गात दंगा करतो .... हे तर देशाचा कारभार जेथून चालतो त्या संसद भवनात सुध्दा धुडगूस घालतात. त्यांच्या मुळेच

हर एक माणूस आज
लाचारीने फाटलेला आहे,
त्यांच्यामुळेच सुर्याचा प्रकाश सुध्दा
आज इथे बाटलेला आहे.

संपूर्ण आभाळच फाटलेलं आहे. तिथं आम्ही किती ठिगळं जोडायची ? आणि जर तुम्हाला असे वाटत असेल की आम्ही हे करू शकतो तर आम्हाला एकोप्याचे, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होण्याचे संस्कार द्या. आम्हाला तेवढे स्वातंत्र्य द्या. मग बघा .... आम्ही करु या चक्रव्युहाचा भेद. आम्ही छाटू त्या गिधाडांचे हात. जे देशाचे लचके तोडू पहात आहेत. आम्ही पुन्हा फुलवू येथे नंदनवन. गरज आहे ती फक्त आम्हाला समजून घेण्याची. आणि स्वत:च्या खोट्या प्रतिष्ठेचा विचार न करता, आम्हाला आमचं स्वातंत्र्य द्यायची. जमेल हे तुम्हाला ? द्याल आम्हाला स्वातंत्र्य ?

## हसणार काय ?



## हाऽ हाऽऽ हीऽ हीऽऽ

गृहस्थ : काय रे तुझी आई कशी आहे ?

मुलगा : बरी आहे.

गृहस्थ : बहीण कशी आहे ?

मुलगा : बरी आहे.

गृहस्थ : अच्छा, मग बाबा तर बरेच असतील.

मुलगा : नाही बाबा एकच आहेत.

### मनुष्य आणि डॉक्टर

एका मनुष्याला प्रत्येक वस्तू सात-सात दिसत असतात. शेवटी या आपल्या दुखण्याला कंटाळून तो एका डॉक्टरकडे जातो व डॉक्टरला म्हणतो, 'डॉक्टर, मला प्रत्येक वस्तू सात-सात दिसतात.' त्यावर डॉक्टर म्हणतात, 'पण तुम्ही एवढीशी गोष्ट सांगायला चार-चार जण कशाला आला आहात ?'

# वक्तृत्व - एक वेड...

- संदीप मगदूम बी. ए. भाग २



वक्तृत्व हे वेड आहे नव्हे ती अनिवार्य ओढ आहे. मनात काहीतरी असावे लागते तरच दुसऱ्याला सांगायची घाई होते. सुरुवातीला शब्दांचे बुडबुडेच ते. हळू-हळू थेंब आणि मग थेंबाचा तयार होतो प्रवाह, शुध्द खळखळणारा. होय ती एक विचारधारा बनते. समाजमन आणि समाज रचना तयार करण्याची.

चारचौघात बोलतानाही आपली भंबेरी उडते, मन संकोचाने भरते, त्यातच सभास्थानी बोलायचे झाल्यास पाय लट-लट कापू लागतात, डोकं गरगरल्यासारखे वाटते, डोळ्यासमोर अंधारी येते, घशाला कोरड पडते, तोंडातून एक शब्दही बाहेर पडत नाही. याउलट काही जणांना चार माणसं पाहिली की स्फुरणं चढतं, सभास्थानी उभं राहिलं की त्यांच्या तोंडातून शब्द पाझरु लागतात. कधी त्यांच्या शब्दविलासाने सभा मंत्रमुग्ध होते. तर कधी त्यांच्या शब्दसंभारांनी सभा अंतर्बाह्य ढवळून निघते. वाणीचं वाग्देवतेचं हे असं वरदान काही मोजक्या व्यक्तिनाचं लाभतं. मग त्यात सीझर, हिटलर, विस्टन चर्चिल अशी पाश्चात्य मंडळी असतील किंवा स्वामी विवेकानंद यांच्या पासून प्र. के. अत्रे, श्री. म. माटे, आचार्य भागवत, स्वा.सावरकर, दादा धर्माधिकारी, राम शेवाळकर, यशवंत पाठक, वसंत गोवारीकर, प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्रा. हरी नरके आणि अलिकडचे प्रा. शिवाजीराव भुकेले सर असतील. या साऱ्या मंडळींचं लहानपणापासून असणारं आकर्षण, त्यांच्या वक्तृत्वाची जादू व त्या जादूमुळे प्रभावित झालेले माझे मन, गुरुजनांचे प्रोत्साहन आणि वक्तृत्व शिकण्याची असणारी तळमळ यामुळे भाषण करायला शिकावं असं वाटत होतं. त्यासाठी प्रयत्न सुरु झाले आणि व्यासपीठावरुन मोडकं-तोडकं बोलता येऊ लागलं.

वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होवू लागलो, यशप्राप्ती होवू लागली, आर्थिक नफा झाला पण त्याहीपेक्षा जीवनाला वळण देणारे, जगाची ओळख पटवून देणारे अनेक बरे-वाईट, मजेशीर अनुभव मिळाले. या अनुभवाच्या जोरावर बरचसं शिकलो आणि भावी आयुष्यात किती अडचणी असणार आहेत हे ही पाहता आलं. त्यातील काही अनुभवांच्यामाध्यमातून तुमच्याशी संवाद साधण्यासाठी हा प्रपंच.....

मी अकरावीत होतो. पुंगाव, ता. राधानगरी येथे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा होती. विषय होता, "स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात काय कमवल आणि काय गमवलं." तेंव्हा हा विषय अगदी गुळगुळीत झाला होता. त्यामुळे स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात भारतानं काय कमवलं की नाही हे माहित नाही पण या विषयानं त्या वर्षात मला फार कमाई करुन दिली होती. असो विषय काय होता. वक्तृत्व स्पर्धा. स्पर्धा सकाळी १० वाजता होती पण भारतीय वेळेनुसार दुपारी २ वाजता सुरु

झाली. सायंकाळी ६.३० वाजता संपली. निकाल जाहीर केला. दैवयोगाने प्रथम क्रमांक मिळाला होता. बक्षिस वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते होणार होता. भारतातील पुढारी वेळेवर येण्यात जगात प्रसिध्द आहेत. त्यामुळे ७ वाजता येणारे पाहुणे ९ वाजता आले. त्यांची ओळख, हार-तुरे, स्थानिक पुढाऱ्यांनी तयार केलेले अर्धा-पाऊण तासाचं रटाळ भाषण, त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे, अध्यक्षांची भाषणे व शेवटी बक्षिस वितरण या प्रमाणबध्द कार्यक्रमुळे बक्षिस रात्री ११ वाजता हातात पडले. बक्षिसा सोबत अनुभवाचही दुसरं बक्षिस मिळालं. त्याचं असं झालं, पुंगाव हे गाव अतिशय आडवळणी, सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी ७ वाजेपर्यंत तीनच बस. रात्री ८ वाजता या गावातून बाहेर पडायला वाहन नसायचं. रात्रीचे ११ वाजलेले, घरी जाणं महत्वाचं होतं. त्यामुळे मी व माझ्या मित्रानं ठरवलं पायीच थोडं अंतर जायचं निघून. एखादी गाडी सापडेल. ३ किलोमीटरवर असणाऱ्या शिरगांव या गावी आलो. तिथंही हीच अवस्था गाडी नाही. गावकऱ्यांनी सल्ला दिला ४ किलोमीटरवर असणाऱ्या आमजाई व्हरवडे या गावी चालत जा. तिथून गाडी मिळेल. चालायला सुरवात केली. थोडं अंतर गेल्यावर एक रिक्षा आली. त्यांना आमची अडचण सांगितली व आमजाई व्हरवड्यापर्यंत घेऊन जाण्याची विनंती केली. रिक्षात चौघेजण होते त्यांनी परवानगी दिली. एक-दोन किलोमीटर अंतर गेल्यावर रिक्षा थांबली. त्यांनी आम्हा दोघांना खिशातील सर्व पैसे द्यायला सांगितले. आम्ही फार विनंत्या केल्या पण त्यांच्या धमकीपुढे काही चालले नाही. बक्षिसाची सर्व रक्कम, खर्चाचे थोडे पैसे सारं काही त्यांनी घेतले व आम्हाला रस्त्यातच सोडून रिक्षा गेली. त्यांना शिव्या देत आम्ही चालत व्हरवड्यावर आलो. रात्रीचा १ वाजाय आला होता. आता गाडीने जावं तरी पैसे नव्हते. तसचं चालत चालत ४ किलोमीटरवर असणाऱ्या भोगावती या ठिकाणी आलो. पाय दुखत होते. पोटात कावळ्यांनी दंगा घातला होता. डोळ्यांचे तीन तेरा झाले होते आणि थंडीच्या दिवसात घामाची अंघोळ झाली होती. अडीच वाजले होते. काय करावं सुचत नव्हते. त्यावेळी कारखाना सुरु होता. ट्रॅक्टरवाल्याला विनंती करुन शेळेवाडीपर्यंत आलो. तिथून दुसऱ्या ट्रॅक्टरमधून सकाळी चार वाजता गावात पाय टाकले. अंथरुणात पहुडलो आणि विचारचक्र सुरु झालं. परत स्पर्धा करायच्या नाहीत. त्या स्पर्धांही नकोत आणि बक्षिसंही नकोत. सकाळी ९ वाजता उठलो. तेवढ्यात दुसऱ्या स्पर्धेची जाहिरात हाती पडली. संध्याकाळचा सर्व प्रसंग विसरुन पुन्हा त्याच प्रवासाला सुरवात पण एक अनुभव पाठीशी घेऊन.

असे अनेक अनुभव आले. कधी वक्तृत्व स्पर्धा संपल्यानंतर स्पर्धा स्थळी पोहचलो तर कधी स्पर्धकांच्या कमतरतेमुळे स्पर्धास्थळी जाऊन सुध्दा स्पर्धा रद्द झाल्या. स्पर्धेहून परत येताना वेळ झाल्यामुळे एस्-टी स्टॅन्डवरच खाली वर्तमानपत्र अंथरुण रात्री काढाव्या लागल्या. अशा वाईट अनुभवाबरोबर अनेक चांगले अनुभवसुध्दा येतात.

वक्तृत्व स्पर्धेतील सर्वात मोठी कमाई त्या ठिकाणी भेटणारी माणसं. माणसातील माणुसकी, आत्मियता, प्रेम, जिव्हाळा या साऱ्यांचं मिश्रण स्पर्धेतून प्राप्त होतं. एखाद्या ठिकाणी भाषण सुंदर झाल्यानंतर तेथील लोकांच्याकडून मिळणारी शाबासकी, स्तुतीचे

शब्द अंगावर मुठभर मास चढवून जातात. स्पर्धेत होणाऱ्या ओळखींच्यामुळे आपले अनेक ठिकाणी लवकर कामे होतात याचीही प्रचिती आली.

स्वत:च्या व्यक्तिमत्व विकासात वक्तृत्व फार मोलाची भूमिका बजावते. वक्तृत्वामुळे आपल्याला बोलता येते पण कुठं बोलाव यापेक्षा कुठं बोलू नये, काय बोलावं यापेक्षा काय बोलू नये, किती बोलावं यापेक्षा किती बोलू नये यासारखे ज्ञान मिळतं. त्यामुळे आपल्या दैनंदिन जीवनात आपली बाष्फळ बडबड थांबते. वक्तृत्वामुळं आपल्यात प्रचंड आत्मविश्वास येतो. आपण आपली मतं पूर्ण आत्मविश्वासानं मांडू शकतो. समोरच्या व्यक्तिवर आपली छाप पाडू शकता. आपल्यात बहुश्रुतपणा येतो. जीवनात येणाऱ्या कोणत्याही प्रसंगाशी दोन हात करण्याची तयारी वक्तृत्वामुळं येते. म्हणून वक्तृत्व शिका, त्यासाठी प्रयत्न करा, प्रयत्नानं अशक्य काहीच नाही.

कारण तुकाराम महाराज म्हणतातचं

अक्षाध्य ते क्षाध्य । करिता क्षायास ।
कारण अभ्यास । तुका म्हणे ।।

❖ ❖ ❖

# जीवन मुल्य

*जीवाला जीव देणारा, संकटात साथ न सोडणारा, स्वार्थाला तिलांजली देऊन, मैत्रीसाठी, त्याच्या मित्रप्रेमाखातर त्याला योग्यवेळी योग्य सल्ला देणारा, मित्राचे हित पाहणारा, केवळ त्याची स्तुती न करता त्याच्या चुकांवर, अवगुंणावर बोट ठेऊन त्या चुका त्याच्या नजरेत आणून देणारा मित्र लाभणं कठीण. जर असे दोन मित्र अस्तित्वात असतील तर त्याच्या त्या निर्लोभी मैत्रीपुढे आपणास नतमस्तक होण्यास कधीच कमीपणा नाही.*

*दुधात पाणी घातलाच दुधाने पाण्याला, आपल्या मित्राला म्हणजे मित्र धर्माला अनुसरुन आपले गुण दिले. त्यामुळे दुधाचा भाव पाण्याला मिळाला. दुध वापरण्याअगोदर ते दुध जेंव्हा तापविण्यासाठी चुलीवर ठेवण्यात आले तेंव्हा त्या दुधाला ताप सहन करावा लागला. हे पाहून पाण्याने आपल्या मैत्रीला जागून स्वतःच अग्नीत बलिदान दिले. आता दुधाने विचार केला. आपण स्वतः त्याग करुन दुसऱ्याचा प्राण वाचवू पाहतो त्या पाण्यासाठी आपल्या मित्रासाठी आपणही बलिदान करायला हवं. म्हणून ते भांड्यातून वर उकलून अग्नीत जाण्यास निघाले. तेंव्हा घरातील स्त्रीने दुधामध्ये पाण्याचे काही थेंब टाकले. तेंव्हा दुधाला आपला प्राणप्रिय सखा भेटल्याचा आनंद हा अवर्णनीय होय. म्हणूनच जीवनाचे दुसरे नाव म्हणजे मैत्री होय.*

**- कु. ज्योती किणिंगे** बी. एस्सी भाग ३

# व्यसन सोडा जीवनाशी नातं जोडा

- कु. स्मिता पोवार बी. एस्सी भाग ३



*"गुटख्या देतो जीवाला झटका*
*म्हणून सांगते मित्रांनो ऐका*
*वेळीच घ्या धडा*
*व्यसन त्याचे सोडा"*

मित्रांनो व्यसन हे खूप वाईट आहे. जळू जशी अंगाला चिकटल्यानंतर रक्त पित जाते व ती सहसा निघता निघत नाही तशी व्यसनाचीही बाब असते. एकदा ते जडलं तर लवकर सुटण्याचा मार्ग बघत नाही. हल्लीच्या युवकांत दारु, गुटखा, सिगारेट, मावा यासारखी व्यसने फार मोठ्या प्रमाणात पसरली आहेत. त्यांच्या दृष्टीनं व्यसन म्हणजे जणू फॅशनच ! अशी कल्पना निर्माण झाली आहे. महाविद्यालयीन युवकापासून शाळकरी मुलांपर्यंत या व्यसनांनी कमी-अधिक प्रमाणात आपले हात-पाय पसरले आहेत.

सरकारने गुटखाबंदीचा एक चांगला निर्णय घेतला. गुटखाविक्री प्रत्यक्ष बंद झाली असली तरी चोरटी विक्री मोठ्या प्रमाणात बऱ्याच ठिकाणी सुरु आहे. हे लक्षात घेता खरच गुटखाबंदी झाली का ? असा प्रश्न निर्माण होतो. सरकार आदेश काढते त्याची अंमलबजावणी चार-आठ दिवस जास्तीत-जास्त महिनाभर काटेकोरपणे केली जाते. मग नंतर काय ? पुढं तस मागं. व्हायचा तसा गुटख्याचा धंदा होतोच. त्यांना व्हायचा तसा फायदा होतोच व युवकांना मिळायचा तसा गुटखा मिळतोच. काही ठिकाणी गुटखा बंदीचा निर्णय घेतला जातो तर काही ठिकाणी त्याची राजरोसपणे विक्री होत असते. जसे की महाराष्ट्र - कर्नाटक सीमावर्ती भाग. महाराष्ट्रात गुटखाबंदी आहे. तर कर्नाटकात त्याची राजरोसपणे विक्री केली जात आहे. त्यामुळे गुटखा हा लोकांना मिळतच राह[illegible] त्यामुळे या गुटखाबंदीचा काय उपयोग आहे का[illegible] त्यापेक्षा तुम्हीच याचा विचार करुन योग्य काय[illegible] अयोग्य काय ? हे ठरवून जाणून घेऊन योग्य वेळी, यो[illegible] ठिकाणी आणि योग्य तो निर्णय घेऊन स्वतःल[illegible] सावरणचं योग्य होईल.

गुटख्याची दोन मिनिटांची नशा आपल्य[illegible] आयुष्याची अंत्यत वाईट दशा बनवते. या व्यसनां[illegible] आपलं आयुष्य काही क्षणांनी, मिनिटांनी, दिवसां[illegible] कमी होत आहे. याचा आपण कधी विचार केलाय क[illegible] ? मित्रांनो,

"जीवन असतं जगण्यासाठी
असतं ते हसण्या-खेळण्यासाठी
नसतं ते कचरा-कुंडीत टाकण्यासाठी"

गुटखाबंदी झाली तरी तंबाखू आणि मावा यां[illegible] प्रमाण मात्र फार वाढलं आहे. ज्या वयात मुलांच्य[illegible] हातात वही-पेन पाहिजे त्या वयात जर त्यांच्या हाता[illegible] चुना-तंबाखू असेल तर काय उपयोग ! व्यसनांमु[illegible] आजचा युवक भरकटला जात आहे. तो दिशाहीन हो[illegible] आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने देशाची प्रगती साधणा[illegible] देशाचा कणाचं जर असा दिशाहीन झाला तर आपल[illegible] देश कोणत्या प्रकारे आपली प्रगती साधणार ? हे ए[illegible] प्रश्नचिन्हच आहे. त्यासाठी मित्रांनो व्यसन सोडा आणि खऱ्या अर्थाने आपल्या देशाला जगाच्या नकाशात उच्च पातळीवर नेण्यासाठी आपल्यापरीने हातभार लावा. आयुष्यात भारताला एक महासत्ता बनविण्याचं काम आम्हालाच करायचयं आहे. म्हणून मित्रांनो तरुणाईल[illegible] लागलेल्या व्यसनरुपी कीडीचा वेळीच बंदोबस्त करा



# प्रेम

प्रेम ही एक अग्निफुलांची बाग आहे,
आणि काळजाला लागलेली आग आहे.
प्रेम करणे ही जरी संस्कृत्ती असली तरी,
त्यात विकृती येऊ देऊ नका.
एका हातात गुलाब असला तरी,
दुसऱ्या हातात चाकू घेऊ नका.

- प्रवीण पाटील बी.ए.भाग २

# सोनेरी दिवस



गेले ते दिवस, सरल्या त्या रात्री
आधी होती प्रेमाची वर्षा
आता झाली फक्त एक चर्चा
होती त्यावेळी नवप्रेमाची आस
आता झाले सगळे भकास-भकास
गेले ते दिवस .............

नवप्रेमाचा अंकूर होता नवा-नवा
नेहमीच वाटे तो जवळ हवा-हवा
पण झाले काही विपरीतच
ते झाले फक्त एक अपूर्ण स्वप्नच
गेले ते दिवस .............

काय म्हणावी महंती त्या प्रेमाची
वाटले नव्हते एवढी होळी होईल मनाची
फुललेल्या त्या नवप्रेमाची पालवी
गेली ती सगळी जळून सावली
गेले ते दिवस .............

- कु. अश्विनी पाटील बी.ए.भाग २



# आठवण

आठवणीच्या नाजूक
तारांना छेडतांना उमटलेले सूर .............
कधी कधी मोरपिसाच्या स्पर्शासारखे भासतात
तर कधी कधी गुलाबाचे काटेही वाटतात
तर कधी हळव्या भावनांचा मंजूळ स्वर
होऊन मनात घुमत राहतात.
कधी कधी ते बागेतील मोगऱ्याच्या
सुवासासारखे दरवळत राहतात
तर कधी पाण्यावर चालणाऱ्या नावेप्रमाणे
हेलकावे खातात.
कधी कधी ओठांवर नकळत हसू फुलवतात
तर कधी डोळ्यात आसवे आणून सोडतात
खरच, मनाच्या कोपऱ्यात खोलवर
दडलेल्या नाजूक तारांना छेडतांना उमटलेले
सुर मोहक असतात !

- कु. सुमन मांडवकर बी. एस्सी. भाग १

# पश्चाताप

गीत हे गाशील तेंव्हा
मी जगी असणार नाही.
प्रीत ही आठवशील तेंव्हा
मी तुला दिसणार नाही.
कालचे ना आज पाणी
अर्थ तो उरणार नाही.
पाहुनी चंद्राकडे मी
आसवे पुसणार नाही.
चांदणे बिलगेल अंगा
कोवळे रेशीम होऊन,
त्याक्षणी पाऊल माझे
पुन्हा फसणार नाही.

- कु. रुपाली वारके
बी.ए.भाग ३



# एक विदूषक

एक विदूषक होता,
रोजचा दिनक्रम चालू होता,
येणाऱ्यांना हसवत होता,
जाणाऱ्यांच्या आठवणी बनत होता,
सगळ्यांना हसतांना आनंद त्याला व्हायचा
दुःखी असणाऱ्यांना हसतांना पाहून,
तोही दुःख विसरायचा,
एक दिवस खेळ करतांना,
घोड्यावरुन पडला,
जीवनभर सडला,
कारण मॅनेजर म्हणाला "काय मर्दा,
काय तुझा फायदा
आता तू झालास अर्धा,"
हसवणाऱ्यांना हसत होता
एक होता विदूषक
डोळ्यात अश्रू ढाळत होता,
आता कोणी विचारत नव्हतं
त्याच आयुष्य संपल होतं
हार त्यानं मानली नाही
आत्महत्या केली नाही
आयुष्यासाठी लढत लढत मेला
एक विदूषक निघून गेला
एक विदूषक .......
निघून गेला.

- राजाराम कांबळे
बी. ए. भाग १

# खंत

सूर नाही गाऊ कशी ?
धीर नाही राहू कशी ?
हदय सारे तुजसाठी
मुकी मी रे सांगू कशी ?
दूर-दूर तु रे सख्या
तुज पाशी येवू कशी ?

- उत्तम ज्ञा. पालकर
बी. ए. भाग ३



# भेट

पहिलीच होती आपली भेट
घेऊन चालणार नाही दोघांनाही लेट
संध्याकाळच्या शांत प्रहरी
प्रेमाच्या त्या हलक्या लहरी
आगळी-वेगळी भेट ही आपुली ।

दिलेल्या वेळी
ठरलेल्या स्थळी,
संध्याकाळ सुमारास
समुद्र किनाऱ्यास
आगळी वेगळी भेट ही आपुली ॥

सुर्य पाण्यात बुडल्याक्षणी
शीतल चंद्र उगवत्या क्षणी
चांदण्या वर्षावात
लाटांच्या प्रवाहात
आगळी वेगळी भेट ही आपुली ।॥

दोघेही आलो त्या ठिकाणी
वाळूच्या बिछानी बसुनी
क्षणीकचे ते प्रेमळ रुसणे
ओठावरचे स्मित हसणे
आगळी वेगळी भेट ही आपुली ।

- राहुल चव्हाण बी.ए. भाग २

## विश्व विनाशक

मी आहे विषाणू
जगाच्या विनाशाचा
माझ्यावर नाही लस
मला करत नाही कोणी भस्म
मी आहे राजा पांढऱ्या पेशीचा
जगाच्या विनाशाचा
मला आवडते रक्त गोड
दुसऱ्यांशी होतो माझा जोड
मी आहे शक्तीमान सर्व पेशींचा
जगाच्या विनाशाचा
ज्याला आहे वासना
त्याची मला उपासना
मी आहे अजरामर मानवी देहाचा
जगाच्या विनाशाचा
माझा नाही अंत
याची मानवाला खंत
मी आहे विषाणू
जगाच्या विनाशाचा

- सागर कांबळे बी. ए. भाग ३

## ओळख

तुझी ओळख तूच करुन दिलीस
तुझ्या तरल नयनांनी माझं
सर्वस्व घेऊन गेलीस !
बेभान जीवाला
दु:खी मनाला
तुझी ओळख तूच करुन दिलीस !

- दयानंद भोई बी. ए. भाग २

## भोळा भाबडा तू शेतकरी

भोळा भाबडा तू शेतकरी हातात काठी
खांद्यावर घोंगडी
भोळा भाबडा तू शेतकरी.....
अंगावर चिंध्या सोबतीला खंड्या
नको राबू रे आतोनात गड्या
थकलेल्या जीर्ण शरीरास तू
आराम दे एकदा तरी
भोळा भाबडा तू शेतकरी .....
गाडून नांगर ऋण फेडीशी
आपल्या मातृभूमीचे
स्वत:च उपाशी राहून
करीशी पोषण सर्व जीवांचे
गरिबी आहे वेड्या तुझ्या जीवनात जन्मभरी
भोळा भाबडा तू शेतकरी .....

- संतोश शा. रानमाळे बी.ए.भाग १

## भेटशील का ?

बोलत नाहीस मग बघतेस कशाला ?
हसत नाहीस मग लाजतेस कशाला ?
तुझ्या मनात आहे तर,
कोड्यात टाकतेस कशाला ?
मला बघून लाजून
मान खाली घालतेस
प्रेम करतेस मग
बोलायला का लाजतेस ?
तुला एकटक पाहण्यास
माझा वेळ जातो निघून
एकदा तरी येवून जा प्रिये
मला तू प्रमाणे भेटून
तू कोरलेलया हातावरच्या खूणा
अजून माझ्या ह्रदयात आहेत
खूणा जरी पुसून गेल्या तरी
जखमा माझ्या मनात आहेत.



- युवराज चौगले बी.ए.भाग १

## श्रावणसरी



रिमझीम रिमझीम श्रावण सरी
सर्वांच्या मनाला वाटावी बरी
मध्येच वाहतो वाऱ्याचा झोका
जसा चुकावा हृद्याचा ठोका.

हळुवार पडते कोवळे ऊन
जसे धरतीवर सोनेरी पांघरुन
कोवळे हे सुंदर गवत
धरतीला वाटावी माझी सवत.

श्रावणातील हा सुंदर बहर
धरतीने केला जसा कहर
खळखळ वाहते गढूळ पाणी
दगडगोट्यातून गाऊन गाणी.

सुंदर सुंदर गार गालिचे
जशी पांघरावी साडी मखमलीची
नेहमीच यावा असा श्रावण
अन् धरतीला करावी पावन !

- दत्तात्रय स. पाटील बी.ए. भाग १

## सुगी



आली-आली सुगी
लोंब लागली झुलू
शेत धनी लागला फुलू
हीच त्याची भोगी
आली आली सुगी.

शिवारात सुरु भातं कापणी
माळावर भुईमुग काढणी
त्याचा तो आनंद भोगी
आली - आली सुगी.

शेतात दिसबर राबुनी
मळणीसाठी रातभर जागुणी
सर्जा-राजास गीत गाऊन सांगी
आली-आली सुगी.

घरा-दारात धान्याचा पसारा
हाय त्याचा दिवाळी दसरा
हाच आनंद त्याचा मोठा जगी
आली-आली सुगी.

- शिवाजी कांबळे बी.ए. भाग २

## वीर



पर्वा न तुला जन्माची
न अंगातल्या रक्ताची
चाळण झाली जरी अंगाची
पाठ नाही शत्रुला दाखवायची
काय सांगावी कथा
या वीराच्या छातीची

- रामचंद्र पाटील बी.एस्सी भाग ३

## जीवन

जीवन म्हणजे खेळ नव्हे,
फुकट मिळालेला वेळ नव्हे.
जीवन एक कोडं आहे,
सोडविल तितकं थोडं आहे.
जीवनात येऊन मित्र मिळवावे,
सुख-दुःख एकमेकांना कळवावे.

- ज्ञानदेव फासके बी.ए. भाग २

## आई

आठवणीत तुझ्याग आई,
मी गेलो झुरुण बाई,
तुझी येते आठवण जेंव्हा
मज कांहीच सुचत नाही.
तु गेलीस सोडून तेंव्हा
मज कांहीच कळत नाही
होतो तुझाच लडीवाळा
तुझ्या वाचून जमत नव्हते
तुझी आठवण जेंव्हा येते
मी फोटोकडे पाहतो
ह्दयातुनी दु:खाचा
मग पाझर फुटून येतो.
आई, घेवून येतो श्रावण
तुझ्या स्मृतीचे शहारे
येती तेंव्हा भरुणी
तुझ्या लेकराचे डोळे

- संदीप साठे बी.ए. भाग २



## मंत्र्याची तिजोरी, घोटाळ्यांचा ठेवा (विडंबन)

मंत्र्याची तिजोरी, घोटाळ्यांचा ठेवा
उघड बॅग रावा आता उघड बॅग रावा ॥धृ॥
खाते पैसे, डोळे मिटूनि जात मंत्र्याची
मनी मंत्र्याच्या का रे ? भिती सी.बी.आय. ची
सरावल्या हातांना या, त्रास का पडावा
उघड बॅग रावा आता ..... ॥१॥
भ्रष्टाचार भिंतीवरचा आरसा असावा,
आपलाच मुखडा पाहून दिवस छान जावा
असाच यांनाही माल मिळत जावा
उघड बॅग रावा आता ..... ॥२॥
उजेडात करता पुण्य, अंधारात पाप
प्रत्येकाच्या हाती आहे भ्रष्टतेचा छाप
याच दुष्टदुर्जनांची लोक करतात हो सेवा
उघड बॅग रावा आता ..... ॥३॥

- सर्जेराव केसरकर बी.ए.भाग २

## मला वाटतं

मला वाटत,
आपल्या वोघांच प्रेम
जन्मोजन्मी राहवं
त्याच्या सुगंध घेत
तुझ्या सौंदयात वाहत जावं,
तु मला पहावं,
आणि जवळून मी हसत जावं.

- साताप्पा खोत बी.ए. भाग २

## प्रेमासाठी

तु अबोल झालीस की,
तुझ्या आठवणी घेवून
मी,
घरट नसलेल्या पाखरांसारख
भटकत असतो दाहिदिशाना.....
तेंव्हा,
त्यासुध्दा मला समजून न होता
अबोल होतात तुझ्यासारख्या
आणि,
माणसानाही सवय झालीय
माझ्या उदास मनाची
यासाठीच
ती सुध्दा मला नाकारतात
मग तूच सांग
मला कोण उरतं तुझ्याशिवाय.....?
म्हणूनच
तू बोलत रहा,
जिव्हाळ्यान आत्मियतेनं, स्वत:ला विसरुन
फक्त प्रेमासाठी ......!

- दत्तात्रय चौगले बी.एस्सी भाग ३

## माझं ध्येय

मला शिकायचं आहे, खूप शिकायचं आहे.
ज्ञान सागराच्या कडेला डबके होऊन साचण्यापेक्षा
त्या सागरात अखंड तरंगत रहायचं आहे
ज्ञानामृत सतत प्राशन करायचं आहे
त्यासाठीच मला खुप शिकायचं आहे.
बर्फाच्छावीत शिखरे सूर्याकडे झेपावतात
कधी कधी ती शिखरे आकाशालाही भेदतात
वाऱ्यालाही अडवण्याचं धाडस ते करतात
मलाही अगवी तसचं खंबीर बनायचं आहे
आणि त्यासाठीच मला खूप शिकायचं आहे.
गरुडाची भरारी हे त्याचे कौशल्य असते
ती भरारी अगदी आकाशालाही लाजवते
त्याच्या अंगी ते सामर्थ्य कुठून येते ?
मला ही ते सामर्थ्य मिळवायचं आहे
आणि त्यासाठीच मला खूप शिकायचं आहे.
वादळांची भित सर्वांनाच वाटते
त्यांच्यामुळे सारेच उध्वस्त होते
सगळेच आयुष्य दिशाहीन होते
त्या वादळातही मला दिशा शोधायची आहे
आणि त्यासाठीच मला खूप-खूप शिकायचं आहे.

**- कु. गितांजली शिंदे** बी.ए. भाग २

## सृष्टी

मेघराजाने गरजत-गरजत
सडा शिंपला अश्रूंचा
त्या अश्रूंच्या जलबिंदूनी
चेहरा फुलविला सृष्टीचा
पाने-फुले वेली नाहल्या
या मेघाच्या आसवाने
अवघी सारी सृष्टी बहरली
मेघराजाच्या प्रेमवर्षावाने
झुळू-झुळू पाणी वाहते आहे
नदी-नाल्यांच्या संगतीने
सृष्टी ही अशी बहरली
मेघराजा हर्षला, तिच्या सौंदर्याने
हिरवळ सजली या धरतीवर
वेलीवर फुले बागडू लागली
या फुलावरुन त्या फुलावर
फुलपाखरे उडू लागली.

**- दिलीप पाटील** बी.ए. भाग ३



## आईची माया

आई आणि मातृभूमी यांच श्रेष्ठत्व स्वर्गाहून अधिक ओ ------------------------------------ : वाल्मिकी
आईच्या डोळ्यातील रागाच्या पाठिमागे वात्सल्याचे सागर उचंबळत असतात ---------------: वि. स. खांडेक
पृथ्वीवर आई हिच एक देवता आहे की, जिच्याबद्दल कोणी नास्तीक नाही -----------------------: ई. लेंग
आईने पाठिवरुन प्रेमळपणाने हात फिरवून केलेला उपदेश साऱ्या ग्रंथालयातील ज्ञानापेक्षा पवित्र असतो. ---: साने गुरुजी
खरोखरच जगात मला सर्वात मोठी देणगी कोणाकडून मिळाली असेल तर ती माझ्या आईकडून -------: विनोबा भावे
आई असे पर्यंत तीची किंमत वाटत नाही, पण ती गेल्यावर मग जगात कशाचीच किंमत वाटत नाही. -----: आचार्य अ

**- दयानंद तौकरी** बी.एस्सी. भाग ३

# जिमखाना पदाधिकारी व विद्यार्थी संसद

## जिमखाना पदाधिकारी

जिमखाना चेअरमन



प्रा. डॉ. एस. बी. देसाई

जिमखाना व्हा. चेअरमन



प्रा. एस. एन. झेंडे

जिमखाना प्रमुख



प्रा. एन. डी. पाटील

## विद्यार्थी संसद



संदीप मगदूम, विद्यापीठ सचिव
बी. ए. भाग 2
सांस्कृतिक प्रतिनिधी



कु. गीतांजली शिंदे
बी. ए. भाग 2
वर्ग प्रतिनिधी



कु. गीतांजली पाटील
बी. ए. भाग 3
वर्ग प्रतिनिधी



नंदकुमार पाटील
बी. ए. भाग 3
क्रीडा प्रतिनिधी



विनायक डवंग
बी. एस्सी. भाग 2
एन. एस. एस. प्रतिनिधी



कु. जयश्री कोरे
बी. ए. भाग 2
विद्यार्थिनी प्रतिनिधी

# आमचे गुणवंत



कु. गीतांजली शिंदे
बी. ए. भाग 1
शिवाजी विद्यापीठ शिष्यवृत्ती



संदीप मगदूम
बी. ए. भाग 1
शिवाजी विद्यापीठ शिष्यवृत्ती



कु. अश्विनी पाटील
बी. ए. भाग 1



प्रदीप पाटील
बी. ए. भाग 1



अजित पाटील
बी. ए. भाग 1



विक्रमसिंह पाटील
बी. ए. भाग 1



सुनिल कुदळे
बी. ए. भाग 2



कु. माया सुतार
बी. ए. भाग 2



विकास पाटील
बी. ए. भाग 2



निवास पाटील
बी. ए. भाग 2



अमोल पाटील
बी. ए. भाग 3



कु. रंजना पाटील
बी. ए. भाग 3



कु. संगीता फराकटे
बी. ए. भाग 3



कु. अस्मिता भाकरे
बी. एस्सी. भाग 1



किरण गोजारे
बी. एस्सी. भाग 1



अभिजीत देसाई
बी. एस्सी. भाग 1

# आमचे गुणवंत



कु. गीतांजली पाटील
बी. एस्सी. भाग 2



कु. सरिता पाटील
बी. एस्सी. भाग 2



दत्तगुरू मोरे
बी. एस्सी. भाग 2



कु. अश्विनी सावंत
बी. एस्सी. भाग 2



विजय पाटील
बी. एस्सी. भाग 3



संदीप गुरव
बी. एस्सी. भाग 3



संजय मडूरकर
बी. एस्सी. भाग 3



प्रशांत शिंदे
बी. एस्सी. भाग 1
शिवाजी विद्यापीठ,
बेसिक स्टॅट क्वीझ दुसरा



संदीप मगदूम, बी. ए. भाग 2
महाविद्यालयाचा महाराष्ट्रभर घुमणारा
बुलंद आवाज



विविध ठिकाणी पटकावलेल्या अपंगांच्या
भालाफेक स्पर्धेतील पारितोषिकासह
बाजीराव परीट, बी. ए. भाग 1

# विविध उपक्रम



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने
घेतलेल्या रक्तदान शिबीराचे
उद्घाटन करताना
श्री. विजयसिंह मोरसो,
प्रा. सुखदेव भोळे व इतर.



राष्ट्रीय महामार्गावर ट्रकचालक व वाहकांना
एड्स प्रबोधनात्मक राख्या
बांधताना स्वयंसेविका



भूगोल दिनानिमित्त
भूगोलाचे महत्व सांगताना
प्रा. एन. एम्. पाटील



विविध वस्तू प्रदर्शन

# विविध उपक्रम



औंधवर चढाई करताना
इतिहास विभागाचे
प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी



वेंगुर्ला ते गोवा
पदभ्रमंतीचा आनंद घेताना
विद्यार्थी व प्राध्यापक



बी.एस्सी. भाग १ व बी.एस्सी. भाग ३
वनस्पती शास्त्र विभागाची अभ्यास सहल



युवक सहकारी मेळाव्यात
बोलताना प्रा. लक्ष्मण करपे

# विविध उपक्रम



तुरंबे (ता. राधानगरी) येथे
व्यसनांचे दुष्परिणाम
सांगताना प्रा. प्रकाश पाटील



'युथ कॉन्फरन्स'चे उद्‌घाटन करताना
विचारवंत मा. हरी नरके



लोकसंख्या दिनानिमित्त 'जन जागरण' फे
उद्‌घाटन करताना बिद्री कारखाना संचाल
श्री. आबदार



स्वातंत्र्य दिनी भित्तीपत्रकाचे उद्‌घाटन
करताना संस्थाध्यक्ष
मा. दिनकररावजी जाधवसो

# हिंदी विभाग

**आत्मविश्वास जैसी दूसरी दैवीशक्ती नहीं है।**

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर*

विभागीय संपादक

**प्रा. धनंजय दिघे**

# स्पंदन २००२-२००३

## अंतरंग

### गद्य विभाग -


१) राष्ट्रभाषा हिन्दी ............................ कु. कोमल पाटील बी.ए. भाग दो
२) शहीद जवान तुझे सलाम !........................ प्रवीण पाटील बी.ए. भाग दो
३) अंध विश्वास ............................ कु. सुखाताई फराकटे बी.ए. भाग दो
३) मेरी पदयात्रा.................................. अमित सातुसे बी.ए. भाग एक


### पद्य विभाग -


१) भारत का सिपाही ............................ दत्तगुरु मोरे बी.एस्सी. भाग तीन
२) सलाह .......................................... कु. वर्षा पाटील बी.ए. भाग दो
३) एक चेहरा .......................................... कु. राणी खोत बी.ए. दो
४) गर्मी के छंद ...................................... अशोक महेकर बी.ए. भाग दो
५) बेवफाई .......................................... रमेश चौगले बी.ए. भाग तीन
६) प्यार क्या होता है ?................................ अजय पालकर बी.ए. भाग तीन
७) आया सावन झुमके ............................ बजरंग पाटील बी.ए. भाग तीन
८) नसीहत ...................................... कु. मनिषा पोवार बी.ए. भाग दो
९) दूरदर्शन .......................................... महादेव पोवार बी.ए. भाग दो
१०) सिर्फ तुम ...................................... संदीप चौगले बी.ए. भाग तीन
११) शायरी .......................................... शहाजी पाटील बी.ए. भाग दो
१२) इंतजार .......................................... मोहन वाईंगडे बी.ए. भाग तीन
१३) अभागन .......................................... संतोष रानमाळे बी.ए. भाग एक
१४) तुम्हे देखते ही ...................................... संदीप केसरकर बी.ए. भाग दो
१५) जीवन .......................................... विक्रम चौगले बी.ए. भाग दो

# राष्ट्रभाषा हिंदी!

- कोमल पाटील बी. ए. भाग दो

"आसमान में तारे है, पर सुरज जैसा नही, बागों मे फूल है, पर गुलाब जैसा नहीं, दुनियाँ मे भाषाएँ है, लेकिन 'हिंदी' जैसी नहीं। इन शब्दों में हिंदी का गौरव करना उचित होगा।"

भारत वर्ष की प्रांतिय भाषाओं का एक दुसरों से बहनों का नाता है। एक ही माता की कन्याएँ है। पर जेष्ठ पुत्री का विशेष स्थान होता है। और इसी अर्थसे हमारी हिंदी सब बहनोंमे जेष्ठ बहन है।

भाषा का महत्व राष्ट्र के जीवन में अधिक है। भाषा के माध्यम से ही राष्ट्र के लोग विचारों का आदान-प्रदान करते है। यह देश को एक सूत्र में बाँधने का साधन है। राष्ट्रवादी भावना एवं राष्ट्रीय चेतना जागृत करने में भाषा आवश्यक है। भाषा ही चिंतन का माध्यम है। व्यक्ती अपनी भाषा में ही सहज भाव से विचार प्रस्तूत करता है।

"राष्ट्रपिता महात्मा गांधी ने कहा था कि राष्ट्रभाषा के बीना हमारा राष्ट्र गूँगा है।" यह कथन पूर्णतः सत्य है। जैसे महाराष्ट्र की जनपद और ग्रांथिक बोधभाषा मराठी है। पर उसके साथ-साथ लोग तुलसी, कबीर, रहीम के दोहे भी पसंद करते है। फिर भी अंग्रेजी ने प्रतिष्ठा का स्थान प्राप्त किया है। आज हर क्षेत्र में अंग्रेजी भाषा का ही इस्तेमाल हो रहा है। अंग्रेजी में बात करना सुसंस्कृत होने का प्रतिक समझा जाने लगा है। इससे बढकर गुलामी और क्या हो सकती है? अब तो हम अंग्रेजी के दास ही नहीं गुलाम बन गए है। भारतके कुछ क्षेत्रों में हिंदी की उपेक्षा की जा रही है। हर एक देश अपनी भाषा की गाथा गा रहा है। एक भारत ही ऐसा है जो अंग्रेजी से चिपकने के कारण पिछडता जा रहा है।

हमारी संस्कृती और सभ्यता का प्रचार एवं प्रसार तुलसी एवं कालीदास की हिंदी भाषा से ही संभव है। महात्मा जी ने कहा था, इस भाषा प्रचार ने आंदोलन को गंगाजल जैसी पवित्रता प्रदान की है। स्वतंत्रता आदोलन में काम करनेवाले तिलक, म. गांधी, नेताजी, सुभाष, विनोबाजी आदी सभी सहिंदी थे। पंरतु उन्होंने हिंदी को ही अपनी एकात्मता का माध्यम स्वीकार किया।

राष्ट्रभाषा हिंदी के मंदिर के चार दिवार ही हमें एकता में बाँध सकते है। विश्वबंधुत्व, राष्ट्रप्रेम, अंहिसा और मानवता आदि जैसी भावनाओंको बाँधनेवाली हिंदी ही एक भाषा है।

* * *

## ★ देश विशेष ★

*फ्रान्स : एक भी मच्छर नहीं है।*

*भूतान : एक भी सिनेमागृह नहीं है।*

*उत्तर चिली : बारीश नही होती।*

*आईसलॅंड : एक भी वृक्ष नहीं है।*

*हवाईखिप : एक भी साँप नहीं है।*

*सौदी अरब : एक भी नदी नहीं है।*

- युवराज म्हाळूंगेकर

# शहीद जवान तुझे सलाम !

- प्रवीण पाटील बी. ए. भाग दो

"सारे जहाँ से अच्छा, हिंदोस्ता हमारा
हम बुलबुले है इसकी ये गुलिस्ता हमारा"

मुझे अपने भारत देश के जवानों पर बडा नाज है । इस भारत देश की आजादी के लिए अनेक व्यक्तियों ने अपने बलीदान दीये है। आजादी के बाद भी अनेक जवानोंने अपनी जान की बाजी लगाकर देश की रक्षा की । कारगील युध्द से हम सभी परिचित है ही । कारगील के शहिदों को मैं बार-बार प्रणाम करता हूँ। इन्होंने हमारे तिरंगे की लाज रख ली है । कारगील के बचाव के लिए हमारे कोलहापूर जिले के और देश के अनेक जवानोंने अपने तन-मन-धन की कुर्बानी दे दी ।

हमारे शहीद हुये जवानों में अनेक जवान युवा ही थे। कही जवानों की कुछ ही महिने पहिले शादी हुई थी । ऐसे अनेक जवान कारगील के युध्द में अपने भारत देश की रक्षा के लीए शहिद हो गये ।

कारगील मे जो जवान शहीद हुये उनके परिवारों के लीए देश के कोने-कोने से मद्द दी गई । आज भारत देश बडा गर्व महसूस कर रहा है, क्योंकि कई जवान भारत के लिए शहीद हो गये, अनेक संस्थाओने शहिद हुए जवानों के परिवार को आर्थिक मद्द दे दी । हम सभी को ऐसे शहिदोंपर नाज होना चाहिए, जो जवान अपना सुख-दुःख भूलकर, दिन-रात का चैन खोकर, सीमा पर खडे होकर रक्षा करते है । जिनके कारण हम चैन की निंद सोते है । कारगील में जो भी ज्ञात-अज्ञात जवान शहीद हुये उनके प्रती मैं श्रध्दांजली अर्पित करता हुँ । और मुझे ऐसा लगता है कि भारत के सभी लोगोंने उनके प्रति श्रध्दांजली अर्पित करनी चाहिए । आखीर में सबको यही याद दिलाना चाहता हूँ -

*ये मेरे वतन के लोंगो*
*जरा आँख में भरलो पानी*
*जो शहीद हुए है उनकी*
*जरा याद करो कुर्बानी /*



# अंध विश्वास

- सुखाताई फराकटे बी. ए. भाग दो

मैंने सुबह-सुबह अखबार पर नजर डाली तो पहले ही पन्ने पर एक ऐसी खबर पढी, जिससे मुझे आज की पिढी पर गुस्सा आने लगा। पता है वह खबर क्या थी ? "सास ससुर और पती के जुल्मो से परेशान होकर बहु की खुदकुशी" इसी तरह लोगों के अंधविश्वास का नतिजा हमारे समाज के बहु और बेटियों को भुगतना पड रहा है। मैंने अखबार की वह खबर पढना शुरु किया।

अनिता नाम की एक लडकी थी। जो अपने माँ-बाप की एकलौती औलाद थी। बडे ही लाड-प्यार में वह ओ बडी हुयी थी। उसकी शादी, उसके माँ-बाप नें एक बडे घर मे करा दी। संजय नाम का बडा बिजनेस मेन उसका पती था। पहले तो अनिता बडी खुश थी। पर कुछ साल बाद अनिता और संजय को दो लडकियाँ हुयी। पर घर में सबको वंश चलाने के लिए लडका चाहिए था। और दुसरी बात यह की संजय को अपने बिजनेस मे दो लाख रुपयों की जरुरत थी। पर संजय चाहता था कि सारे रुपये अनिता अपने मैकेसे लाए। पर अनिता को ये मंजूर नही था। कौन लडकी अपनी खुशी के लिए अपने माँ-बाप को दुःख पहुँचायेगी। उसने जब मना कर दिया तो पती संजय और अनिता के सास-ससुर ने उस पर मानसिक और शारिरीक अत्याचार करने शुरु किया। और इसी अत्याचार को न सह सकने के कारण उसने खुद को अपने ही घर में जला डाला। ऐसा क्या है, लडकों में जो सभी चाहते है, और ऐसा क्या नही है लडकी में जो लडकों के पास है। फिर भी लोंग अंधविश्वास में जी रहे है और लडकों को ही चाह रहे है।

लोगों के अंधविश्वास का यह बुरा नतिजा है। रोज अखबार में ऐसी अनेक खबरे छपती है, जैसे, दहेज के कारण बहुको जलाया। लडका न होने के कारण बेटे की दुसरी शादी, लेकीन इससे अनिता जैसी लडकीयों को मिलता है, दुःख, दर्द और मौत। लेकिन जुल्म करनेवाले खुले आम घुमते है। इसका किसी पर असर नही होता है। क्योंकि इस समाज ने औरत को खिलौना समझाया है। अंधविश्वास में जखडे हुये लोग ये क्यों नही समझते कि उन्हे एक औरत ने ही जन्म दिया है, और वे औरत को जन्म लेने से मना कर रहे है। इस समाजने ही लडका और लडकी मे भेद किया है। लडकी को हमेशा पिछे रखकर लडके को सारे अधिकार दिये जा रहे है। आखिर ऐसा क्यों ? आज औरत मर्दो के कंधो से कंधा मिलाकर काम करती है। लेकिन पता नही अंधविश्वास में जकडे हुए इस समाज को औरत का महत्व कब समझ में आएगा।

* * *

# मेरी पदयात्रा

- अमित सातुसे बी. ए. भाग एक



प्रवासवर्णन का मतलब है - प्र-दृढ, वस-रहना और वर्णन- जानकारी देना। पर्यटन की जानकारी याने प्रवास वर्णन। प्रवास करते समय प्रवास में स्थल, व्यक्ती, अर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थिती के साथ-साथ ऐतिहासिकता और भौगोलिकता की भी जानकारी लेना।

मैं अब अपनी वेंगुर्ला से गोवा पदयात्रा का अनुभव आपको बताना चाहता हूँ। पहले मैंने और मेरे दोस्तोंने मेरे प्राध्यापकों को यह पूछा कि पदभ्रमंती के लिए हम गोवा ही क्यों जाए। तो प्राध्यापक बोले वहाँ के सांस्कृतिक स्थल, वहाँ का इतिहास, वहाँ के लोंगो का रहन-सहन और समुंदर का लाजवाब सौंदर्य हमको देखने मिलेगा इसिलिए हम गोवा जा रहे है। इसके बाद हमारी गोवा पदभ्रमती तय हो गयी।

आखिर १७ जनवरी के दिन हम सभी दोस्त सुबह सात बजे बिद्री के पेट्रोल पंप के पास अपने सामान के साथ जमा हो गए। थोडी देर बाद ट्रक्स और मार्शल गाडीयाँ वहाँ आ गयी, हमारे साथ प्रा. डी. जी. दिघे, और प्रा.एस. बी. देसाई सर थे। हम कुल मिलकर बाईस छात्र थे जो गाडीयों मे बैठ गए और हम निकल गए।

हम गोवा की तरफ जा रहे थे तब प्रा. एन. डी. पाटील के तारले गाँव मे गए और हमने प्रा. एन. डी. पाटील को हमारे साथ चलने की बिनती की तब सर तैयार हो गए। हम वेंगुर्ला की ओर फोंडा कणकवली मार्ग से जा रहे थे। जाते-जाते हँसी मजाक, गीत-गायन सभी चल रहा था। राधानगर से थोडी दूर फोंडा घाट में हम लोगों को वातावरण में बदलाव महसूस हुआ। हमारी गाडीयाँ साँप की चाल की तरह उस घाट से उतर रही थी। एक तरफ उँचे उँचे पर्वत तो दुसरी तरफ पेड-पौंधो से भरी खाईयाँ थी। उस जैसा वातावरण हमने कभी नही देखा था। चारो ओर हरियाली ही हरियाली हँस रही थी और हम लोंगो का स्वागत कर ही थी। ऐसे दिल को भाने वाले वातावरण में हम लोग गोवा की तरफ जा रहे थे।

हम ढलान छोडकर कणकवली की ओर जा रहे थे। कणकवली मे आते ही सबको शीतपेयों की याद आ गयी। हमने शीतपेयों का आस्वाद ले लिया तब यहा के नारियल, आम, काजू जैसे फलों की भी याद आयी। हँसी-मजाक के साथ कणकवली से हम मालवण की ओर जार रहे थे। वहाँ कसालनगर नामक गाँव से ५० कि.मी. दूर मालवण है। डेढ घंटो के प्रवास के बाद हम मालवण पहुँचे। मालवण शहर मच्छी व्यवसाय के लिए मशहूर है। ऐसा मुझे मेरे दोस्त ने बताया था। मुझे मालवण देखकर बहुत आनंद हो गया। गाडीयों से उतरते ही अतिभव्य समंदर का दर्शन हुआ। हमने समंदर के किनारे हँसी-मजाक के साथ व्हॉलीबॉल, क्रिकेट अदि खेल खेले। वहाँ के लोग मराठी (कोंकणी) बहुत अच्छी तरह बोलते है यह देखकर बहुत खुशी हुई। वहाँसे हम शिवाजी के ऐतिहासिक सिंधुदुर्ग किले पर बोट में बैठकर जा

रहे थे। तब चारों ओर गहरा, अतिभव्य समंदर और उपर निरभ्र आकाश उसकी परछाई पानी में मानों ऐसी लग रही थी की पानी में निला रंग मिल गया है। ऐसे लुभावने वाले वातावरण में हम किले पर पहुँचे। हम लोगों ने प्रथम शिवाजी महाराज (पुतला) के दर्शन किये। किले के तट पर हम जब चल रहे थे तो एक तरफ समंदर की लहरे उसपर जोरों से टकराकर आवाज कर रही थी तो दुसरी तरफ खाई थी। किले पर हमने दो डालीयोवाला नारियल का वृक्ष देखा यह वहाँ का आश्चर्य माना जाता है। जब चारो ओर सागर का खारा पानी और किले की जमीन पर जो कुएँ थे वहाँ मीठा पानी यह तो ईश्वर की महिमा ही लगती है। हम लोग वहाँसे पिछे मुड गए तब श्याम के साडे छह बजे थे। किनारे पर मच्छीमार मच्छीयों की विक्री में गुल थे। वहाँ जाकर हमारे प्राध्यापकों ने सौदा व्यवहार में शामील होकर मच्छी खरीद ली। वहाँ से हम वेंगुर्ला (४० कि.मी.) में मकाम के लिए पहुँचे। उस समय दस बज चुके थे। खर्डेकर महाविद्यालय के अध्यापक से पुछताछ करके वहाँ के प्राचार्य से संपर्क स्थापित किया और खर्डेकर महाविद्यालयमें रहने की इजाजत ले ली हम सभीने साथ बैठकर मालवणी मच्छी का आस्वाद वहाँ ले लिया।

पदभ्रमंती का दूसरा दिन आया तो सभी ने प्रातः विधी पुरे करके वेंगुर्ला और माचेमाड दरमियान हमने सुवह साढे सात बजे सागरेश्वर से पदभ्रमती की शुरूआत की। पदभ्रमती ३०-३५ कि. मी. थी। समंदर के किनारे लहरों की आवाज ऐसे आ रही थी कि मानो कोई संगीत सुना रहा है। हम समंदर किनारे पर व्हॉलीबॉल, क्रिकेट खेलते-खेलते चलने का आनंद ले रहे थे। कोई गीत गा रहा था तो कोई विनोद सुनाकर हँसा रहा था। हर एक दोस्त खुशी में झुम रहा था। समंदर के किनारे मच्छी पकडनेवाले मच्छी पकडने जा रहे थे, तो कई आ रहे थे। हम लोगोंने उन मच्छी मारों की जानपहचान की वे लोग झोपडीयोंमे गरीब परिस्थितीयों में अपना गुजर करते थे। हम किनारा छोडकर बिना जूते पहने पर्वतो में जा रहे थे तब एक किसान से मिले उसने हमे वहाँ पीने के पानी की सुविधा दिलाई। वहाँ की पर्वतो से समंदर के कई बिंदू अच्छी तरह से दिखाई देते थे चलने का अनुभव तो मैं शब्दों मे लिख नही सकता। देखते देखते पर्वतों से बाहर आकर हम अपने गाडीयों की खोज मे लगे, पर हमें शामको पक्का रास्ता दिखाई दिया। बाद में चलने लगे तो चलते चलते हमें वातावरण में होने वाला बदल महसूस हुआ। वातावरण में गर्मी थी। पत्तों की आवाज नही या पवन की लहर नही ऐसे में हम गाणी गुणगुणाते और हँसी-मजाक में रम चल रहे थे। खुशी-खुशी में हम तेरेखोल किले पर पहुँचे। आगे हम बडे से बडे जहाज में गाडीयों के साथ बैठकर म्हापसा इस उपनगर में आ गए। लेकिन हमें हँसी-मजाक मे भोजन या खाने-पीने की भी याद नही रही। शाकाहार-मांसाहार भोजन करके हम फिर प्रथमतः अंजुना बीच गए। वहाँ का अतिभव्य समंदर नजरों में न पहुँचनेवाला था। समंदर की लहरे किनारे पर जोर-जोर से आ रही थी। तब ऐसा लग रहा था कि मानो की लहरे कई संगीत सुना रही है। वहाँ का निसर्ग सौंदर्य देखकर हमें बहुत खुशी हुयी। वहाँ विदेशों से बहुत लोग गोवा का निसर्ग सौंदर्य देखने आते है।

उसके बाद हम कलंगुट बीच पर गए। वहाँ कई लोग सुर्यास्त देख रहे थे, तो कई स्नान कर रहे थे, तो कई बोट में बैठकर सुर्यास्त का आनंद ले रहे थे। वहाँ हम भी उस आनंद में शामिल हो गए। वहाँ कई दोस्तोंने स्नान किया। हम सभीने लहरों का सामना करते हुए सुर्यास्त का आनंद ले लिया। वहाँसे हम पणजी शहर में पहुँच गए। पर गोवा में रात को रास्तेपर भी कोई ठहरने नही दे रहा था। हमारे पास खर्चेके लिए पैसे कम थे। ज्यादा खर्चेके कारण पणजी में

रह नही सके। अत: निवास के लिए गोवा युनिव्हसिटी के गेस्ट हाऊस में रुक गए।

हम पणजी से दोना पॉल बीच की तरफ गए। उस बिच पर कमल हसन के 'एक दुजे के लिए' फिल्म का शुटींग हुआ था। इस की जानकारी हमारे प्राध्यापकों ने हमें दी। यह बीच समंदर में कही अंतर तक बंदिस्त पुल है, यह भी कहा। उस बीच पर सभी दोस्त संजू, शहाजी, सागर, प्रविण, ज्ञानदेव, मोहन और प्राध्यापकोंने मिलकर बहुत फोटो खींचे। वहाँ के आनंदीत क्षणों की याद को दिल में लेकर हम गोवा के ऐतिहासिक और धार्मिक स्थलों को देखने गए। चर्च में सभी ने प्रवेश किया तो बहुत शांत वातावरण था। वहाँ येशू की बडी-बडी मुर्तीयाँ, तसवीरे येशू का इतिहास और एक पुरोहित का देह रखा था। यह देह सिर्फ नाताल के दिन ही बाहर दर्शन के लिए निकालते है। वहाँ हम दुसरे चर्च गए। लेकिन यह देखते समय हमारा ध्यान घडी पर भी था। घडी में ८ बजे थे। हम सभी ने घरवालो के लिए कुछ न कुछ ले लिया। छोटे बच्चों के लिए खेल-खिलौने की चीजे मिठाईयाँ ले ली। हम सावंतवाडी, आंबोली, आजरा, गारगोटी मार्ग से वापस बिद्री में रात के डेढ बजे पहुँच गये। इसीतरह हमारी पदभ्रमंती समाप्त हो गयी।

इस पदभ्रमंती से हमे बहुत कुछ मिला है। निसर्ग सौंदर्य, अनेक प्रकारो की बडी मछलीयाँ, कोली जाती के लोग, उनका जीवन, उनकी रहने की पद्धत, काम की पद्धत तथा आम के बगीचे के मजदूर, उनका रहन-सहन जिससे बहुतसा ज्ञान हमे प्राप्त हुआ जो आगे जिवनमें उपयोगी सिध्द होगा।

* * *

## सफलता की पंचसुत्री

१) जब कभी जीवनमें कोई ऐसी घटना आ जाए, जिसके कारण अपना चरित्र डोलता हुआ प्रतीत हो तो, अपने संयम को जगाईये और प्रश्न कि करे लक्ष्यों से परिपूर्ण हमारा जीवन, कही हमारे चरित्र के कारण अपने लक्ष्य से हट तो नही गया।

२) तणाव, मानसिक परेशानी के दबाव में रहने से और बार-बार सोचने की अपेक्षा उनसे छुटकारा पाने के उपायों पर बिचार करना ज्यादा अच्छा है।

३) प्रेम पास रखने से हम अपना काम शान्ति और लगन से कर सकते है। प्रेम के कारण व्यक्ती अपनी मानसिक स्थिती अच्छी रख सकता है।

४) दु:ख भरे अवसरों को याद मत करों, इससे मानसिक स्थिती बिगडती है। अच्छे दिनों को याद करों।

५) पूरी एकाग्रता के साथ कार्य करें। मन को बहकने न दे। जितना अधिक से अधिक श्रम कर सकते है, करे। अपने लक्ष्य का स्मरण करते हुए सोएँ। फुरसत के क्षणों में भी उसका स्मरण करें। जो कुछकर चुके है, उसकी समीक्षा करें। कितना और करना है यह सोचिए और निरन्तर अपने लक्ष्यकी ओर बढे।

**- विनायक पाटील** बी. ए. भाग दो

## भारत का सिपाही

वीर सिपाही भारत के हम,
आगे कदम बढाते है।
पर्वत झुक जाओ तुम नीचे,
साहसी सिपाही आते है।
नदियों, नालो मार्ग हमें दो,
हमको आगे जाना है।
जिधर देश का बैरी होगा,
उसको वही मिटाना है।
नही आँधियाँ, सर्दी, गर्मी,
रोक सकेगी अब हमको।
बर्छी, भालो, तोप, बन्दूकों,
नही समझते अब हमको।
हमको कदम बढाना है बस,
भारत के हम रक्षक है।
आँख दिखाए जो भारत को,
उसके तो हम भक्षक है।

**- मोरे दत्तगुरु** बी. एस्सी. भाग तीन

## "एक चेहरा"

एक चेहरा,
मुझे हर चिज में दिखाई देता है,
उसे देखकर मुझे बहुत खुशी मिलती है,
उसने ही मुझे आगे बढने का रास्ता दिखाया।
एक चेहरा,
जो मेरी सुख-दु:खो में हमेशा साथ देता है।
जो मेरी आदर्श व्यक्ति और सहेली भी है,
उसने ही मुझे संकटोंपर मात करने की सोच दी।
एक चेहरा,
मेरी खुशी है,
मेरी चाहत है,
मेरी जिंदगी है।
लेकीन,
मेरी यह खुशी चाहत और जिन्दगी, और किसी
को नही मिलेगी।
क्योंकि,
यह चेहरा जिस स्त्रि का है,
वह मेरी 'माँ' है।

**- राणी खोत** बी. ए. भाग दो

## सलाह

देखा था जिसे कभी पिते हुए 'शराब,'
आज देखती हूँ मैं उसकी 'राख'।
पीते है जो ज्यादा 'बिडी'
जल्दी टूट जाती है उनकी जीवन की 'सीढी'
पालते है जो साँपरुपी 'ड्रग्ज'
वही जाता है, एक दीन उन्हे 'डस'
पी थी जी भरके खुब 'वाईन'
जिंदगी की ट्रेन जल्दी उतर गई 'लाईन'
उन्हे पान मसाला था बडा 'प्यारा'
वही आज है उनका 'हत्यारा'
ज्यादा पीते है जो 'रेड ॲन्ड 'व्हाईट'
उनका खुन जो था 'रेड, हो गया 'व्हाईट'

**- वर्षा पाटील** बी. ए. भाग दो

## गर्मी के छंद

सुरज आँख खोलता, करके चेहरा लाल।
धूप हुई अंगार सी, किरणे जलती मशाल ॥
लपटों की महफिल लगी, कुदरत शाल फुलाए।
लू धूँ-धूँ कर चले, पेडों को झुलसाए ॥
धरती भभकी क्रोध से, सुखे सरिता ताल।
ठंड हुई कंगाल सी, गर्मी मालामाल।
घर आंगन ऊंघने लगे, टपके महुआ फूल ॥
आफिस खर्राटे भरे, बाहर उडती धूल ॥
छाया चंदन सी लगे, शीतल मंद सुगंध।
गर्मी के मौसम में मैने लिखे ये छंद ॥

**- अशोक महेकर** बी. ए. भाग दो

## बेवफाई

वक्त ने हमसे बेवफाई की,
मेरी खुशियाँ सारी उसीने छीन ली।
तुम जो मेरी जिंदगी में आयी,
लगा था, खुशियाँ फिर से लौट आयी।
लेकिन मुझे क्या पता था, तुम देने के
अलावा मुझसे कुछ लेने भी आयी।
जिंदगी मे पहली बार भरोसा तुम्ही पे किया था।
तुमसे उम्मीद थी साथ निभाने की,
हाथ मिलाकर साथ चलने की,
साथ जीने की, साथ मरने की।
सपने सजाएँ थे शादी बनाने के,
घूँघट सँजाने के,
बारात तो दोनों की सजेंगी
मगर ........
उधर तेरी डोली उठेगी
इधर मेरी अरथी उठेगी।

**- रमेश चौगुले** बी. ए. भाग तीन

## प्यार क्या होता है ?



प्यार क्या होता है ?
प्रेमियोंकी जिंदगी होती है।
कलाकारोंकी बंदगी होती है।
आत्माओंका मेल होता है।
खिलाडीयोंका खेल होता है।
जीवन का एक गीत होता है।
दुनिया की एक रीत होती है।
जो दोनों को खींच लाता है।
जो भाई-बहन के बीच होता है।
दोस्तो के साथ होता है।
माँ के हाथ में होता है।
और जो प्रियकरोंके, दिल मे बसता है।
प्यार यही होता है, प्यार यही होता है।

**- अजयकुमार पालकर** बी. ए. भाग तीन

## आया सावन झुमके



आया सावन झुमके
गीत गाया पत्थरोंने।
सुर मिलाया हर एकने।

आया सावन झुमके
सजने लगे है सपने।
साज लगे है बजने।

आया सावन झुमके
चमन भी लगा है हँसने।
बादल भी लगे है बरसने।

आया सावन झुमके
रास्ते भी लगे है चलने।
मुसाफिर अपनी मंझिल लगे है खोने।

**- बजरंग पाटील** बी. ए. भाग तीन

## नसीहत

सावधान ! छोरी,
तेरे दिल की हो रही है चोरी।
अब तुझे लगती है प्यारी,
मगर यह मत भूल, यह बात है बहुत बुरी।
बेहोशीमें तू बनेगी उसकी नारी,
आपसमें संसार की बातें होगी सारी।
कई पलमें आयेगी हाथ में पालने की डोरी,
तब तेरे ओठ गायेंगे खुबसुरत लोरी।
यही लोरी सुनकर सोनेवाला बच्चा,
कहाँ मालूम , वह बुरा हो या अच्छा ।
अच्छा हो तो बुढापेमें देगा तुम्हे सुख,
बुरा हो तो ठुकराकर देगा बहुत दु:ख
पती चल बसनेपर, तुझे दिल की चोरी याद आयेगी,
पापी बेटे को देखकर वही भी चल जायेगी।
तुझे सिर्फ आँसूओंको पिके जीना पडेगा,
वह भी खत्म होनेपर, प्यासाही मरना पडेगा।

**- मनिषा पोवार** बी. ए. भाग दो

## दूरदर्शन

पाणी की समस्या, बिजली की समस्या,
हर तरफ है खाने-पिने की समस्या।
लेकीन बस यह काफी नही है,
खडी हो गई है एक अनोखी समस्या,
जिसका नाम है, दुरदर्शन की समस्या।
राम ने मारा रावण को,
कृष्ण ने मारा कंस को,
परंतू इस दूरदर्शन की समस्या ने
मारा हर विद्यार्थी को।
इधर क्रिकेट की मॅच देखने की घडी आयी,
उधर बोर्ड की परिक्षा सिरपर मँडराई,
जिसमें पढाई की नौका बीच मे ही डगमगाई।
किसे चुने समस्या सायने आयी,
मन में है शुरु गजब की लढाई
इस चक्रव्यूह में फँसी है आज
चित्र क्रमांक - ४..................... एस. एम. पाटील बी.एस्सी. भाग २

चित्र क्रमांक - ५........................ राजेंद्र तोंदकर बी.एस्सी. भाग ३

चित्र क्रमांक - ६...................... दत्तात्रय चौगले बी.एस्सी. भाग ३

चित्र क्रमांक - ७........................... विजय कांबळे बी.ए. भाग २

चित्र क्रमांक - ८........................ नितीन दरेकर बी.एस्सी. भाग ३







- अजित पाटील बी. ए. भाग २




- अमोल राऊत बी. एस्सी. भाग २




- युवराज पाटील बी. एस्सी. भाग १




- एस. एम. पाटील बी. एस्सी. भाग २




**- राजेंद्र तौंदकर** बी. एस्सी. भाग ३



**- विजय कांबळे** बी. ए. भाग १




**- दत्तात्रय चौगले** बी. एस्सी. भाग ३




**- नितीन दरेकर** बी. एस्सी. भाग ३

# वार्षिक अहवाल

## सन २००२-२००३

### जिमखाना अहवाल

मा. दिनकररावजी जाधव यांच्या कुशल नेतृत्वाखाली सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून अगदी अल्प विद्यार्थी संख्येवर कला व शास्त्र महाविद्यालयाची सुरवात झाली. आज महाविद्यालयातील विद्यार्थी संस्था एक हजारावर पोहचली आहे. फक्त संस्थात्मक नव्हे तर गुणात्मक प्रगती देखी झाली आहे. या प्रगतीसाठी महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले जाता. ज्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न संस्थेच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन प्राध्यापक, प्राचार्य सतत करीत आहेत. या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विविध समितींच्यावतीने पुढीलप्रमाणे उपक्रम राबविले आहेत. त्या समितीच्या निमंत्रकांनी दिलेले अहवाल पुढीलप्रमाणे -

### परिसर विकास समिती

यावर्षी रु. ११००/- ची शोभेची झाडे आणून महाविद्यालयाच्या बागेमध्ये लावून घेतली.

निमंत्रक ,
प्रा. एस. एस. पाटील

### माजी विद्यार्थी समिती

या शैक्षणिक वर्षामध्ये ही समिती पहिल्यांदाच स्थापन करण्यात आली. या समिती अंतर्गत सप्टेंबर-२००२ मध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजीत केला होता. या स्नेहमेळाव्यास ४५ विद्यार्थी हजर होते. सदर कार्यक्रमाबाबत बऱ्याच विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच माजी विद्यार्थ्यांची समिती तयार करण्याचे काम चालू आहे. सर्व माजी विद्यार्थ्यांनी या संघटनेचे सभासद व्हावे असे आवाहन या समितीमार्फत केले आहे.

निमंत्रक,
प्रा. एस. एस. पाटील

### स्टाफ सेक्रेटरी

या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयांतर्गत तसेच अन्य प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न सतत केला आहे. स्टाफ सेक्रेटरी म्हणून काम करत असताना एक जबाबदारी म्हणून गरजू विद्यार्थ्यांना विद्यार्थी कल्याण निधीमधून आर्थिक मदत मिळवून देणेसाठी प्रयत्न केला आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी बाजीराव परीट याची पॅराऑलिंपीक स्पर्धेसाठी निवड झाल्यानंतर त्याला सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून बहूमुल्य अशी आर्थिक मदत मिळवून दिली आहे.

या शिवाय महाविद्यालय विकासाबाबत मा. प्राचार्य व कार्यालय अधिक्षक यांना स्टाफच्यावतीने ११ मागण्या सुचविलेल्या आहेत. त्या मागण्यांची पूर्तता सुरु आहे.

निमंत्रक,
प्रा. एस. आर. पाटील

### प्रवेश व हजेरी समिती

### प्रवेश समिती

१) बी.ए. व बी.एस्सी. वर्गाच्या प्रवेशासाठी प्रत्येक वर्गास प्राध्यापक नेमणेत आले.

२) बी.ए. भाग ३ व बी.एस्सी. भाग ३ या वर्गांच्या प्रवेश संख्येमध्ये समतोलपणा आणणेचा प्रयत्न केला.

३) दोनपेक्षा अधिक गुणपत्रक असणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या पालकांशी चर्चा केली व पाल्याने चांगले मार्कस् मिळविणेच्या अटीवरती प्रवेश देणेत आला.

४) नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थी-विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात आला.

५) सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची महाविद्यालयामध्ये ८०% उपस्थिती राहणे संदर्भातील हमीपत्रे भरुन घेतली.

## हजेरी समिती

१) बी.ए. भाग १,२,३ व बी. एस्सी. भाग १,२,३ वर्गातील विषयवार विद्यार्थीसंख्या विभागून विद्यार्थ्यांना कळविले.

२) विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नियमित उपस्थित राहणेसाठी मार्गदर्शन केले.

३) प्रत्येक वर्गातील विषयवार विद्यार्थीसंख्या विभागून संबंधीत विषय शिक्षकांना कळविले.

४) विषय शिक्षकांना दररोज हजेरी घेणेसंबंधी सूचना केल्या.

५) महिन्यातून एकदा हजेरी पत्रकाची पडताळणी केली.

६) नियमित गैरहजर विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीची कल्पना पालकास पत्रे पाठवून कळविली.

निमंत्रक,

प्रा. ए. बी. माने व प्रा. एच्. डी. धायगुडे

## कार्यक्रम नियोजन व प्रसिध्दी समिती

या शैक्षणिक वर्षामधील कार्यक्रम नियोजन समिती मार्फत वेगवेगळ्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. तसेच महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांना व उपक्रमांना वृत्तपत्रामधून फोटोसह प्रसिध्दी देण्यासाठी विशेष परिश्रम घेतले आहे. या कामी प्रा. एस. के. सावंत तसेच पत्रकार मा. एकनाथ पाटील, पुढारी, मा. टी. एम. सरदेसाई, सकाळ, मा. श्रेणिक पाटील, मा. रविंद्र शिंदे, लोकमत, मा. भैरवनाथ डवरी, केसरी व महासत्ता, मा. सुनिल पाटील, सकाळ, मा. चंद्रकांत माळवदे तसेच मा. सुनिल डेळेकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

निमंत्रक,

प्रा. पी. एस. पाटील

## विज्ञान समिती

या वर्षात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जागृती व आकर्षण निर्माण करण्यासाठी विज्ञान मंडळ व मराठी विज्ञान परीषद, बिद्री शाखा यांनी संयुक्तपणे भरीव कार्य केले आहे.

१) ऑगस्ट २००२ मध्ये विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयक आकर्षण निर्माण करण्यासाठी प्राध्यापक एम्. जी. तारेकर यांचे 'मनोरंजनातून विज्ञान' या विषयावर व्याख्यान झाले. त्यामध्ये त्यांनी वेगवेगळे मनोरंजक प्रयोग करुन विद्यार्थ्यांना वैज्ञानिक सिध्दांताविषयी जागरुक केले.

२) दि. १८ ऑगस्ट २००२ रोजी भाभा अणुशक्ती केंद्राचे सहाय्यक शास्त्रज्ञ मा. सतीश सोळांकूरकर यांचे 'विज्ञान व साहित्य' या विषयावर व्याख्यान झाले. त्यामध्ये त्यांनी विज्ञान व साहित्य यामधील सहसंबंध उलगडून दाखविला.

३) भाभा अणुशक्ती केंद्र, मुंबई, मराठी विज्ञान परीषद, बिद्री परिसर व विज्ञान मंडळ, दूधसाखर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३,४ व ५ ऑक्टोबर २००२ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थी, भागातील शिक्षक व शेतकरी यांच्यासाठी ३ दिवसांची कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात जवळ जवळ २०० विद्यार्थी, ९० शिक्षक व साधारण १०० शेतकरी यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून बी.एस्सी भाग ३ च्या विद्यार्थ्यांनी दि. १५,१६,१७ जानेवारी २००३ रोजी भाभा अणुशक्ती केंद्रास प्रा. एस्.एन्. कुलकर्णी व प्रा. एम्. व्ही. टाळके यांच्या मार्गदर्शनाखाली भेट देऊन तेथील विविध विभागांची पाहणी करुन माहिती घेतली.

४) दि. २८ फेब्रु. २००३ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी भाभा अणुशक्ती केंद्राच्या माहिती व प्रसारण विभागाचे प्रमुख डॉ. आर. के. शर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून, संस्था उपाध्यक्ष मा. बाबासाहेब पाटील हे अध्यक्ष म्हणून तर डॉ. डींगणकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमास रेडीओ ॲक्टीव्हीटी, गॅमा रॅडीएशन, टीॲक्टर व त्याची सुरक्षा या विषयी माहिती देण्यात आली. दुपारच्या सत्रात प्रा. टाकळे यांचा 'खगोलशास्त्र' या विषयावर स्लाईड शो प्रसारीत करण्यात आला. त्यामध्ये त्यांनी ग्रह व तारे त्यांचे लाईफासायकल (जीवनचक्र), गॅलेक्सी टीव्ह्यूलेशन यावर माहिती दिली. विज्ञान मंडळाचे काम पाहताना मला माझे सहकारी प्रा. डॉ. कुलकर्णी व डॉ. गायकवाड यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

निमंत्रक,

प्रा. एस्.एच्. पाटील

## वाड्.मय, भित्तीपत्रक व मॅगेझीन समिती

या सालामध्ये समितीच्यावतीने पुढील उपक्रम घेण्यात आले.

१) दि. ३१/७/०२ रोजी वाङ्‌मय मंडळ उद्‌घाटन झाले.

२) भित्तीपत्रकाचे चार अंक प्रसिध्द करण्यात आले.

३) दि. १६ ऑगस्ट २००३ रोजी इंग्रजी व मराठी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.

४) दि. १४ सप्टें. २००२ रोजी हिंदी निबंध स्पर्धा घेण्यात आली.

५) दि. १८ ऑक्टो. २००२ रोजी हिंदी विभाग व या समितीच्या वतीने 'हिंदी दिन' समारोह घेण्यात आला.

६) कोल्हापूर केंद्रावरुन प्रसारीत झालेल्या 'युववाणी' या कार्यक्रमामध्ये मुलांनी काव्यवाचन केले.

निमंत्रक,
प्रा. ए. जे. वारके

## शैक्षणिक सहल समिती

या शैक्षणिक वर्षात शनिवार दि. १२ ऑक्टोंबर २००२ रोजी मुलींची पदभ्रमंती मोहीम - राधानगरी ते काळम्मावाडी या मार्गावर आयोजित केली होती. ती यशस्वीरित्या संपन्न झाली.

तसेच १७ ते १९ जानेवारी २००३ या तीन दिवसामध्ये वेंगुर्ला ते गोवा या मार्गावर विद्यार्थ्यांची पदभ्रमंती मोहीम आयोजित केली होती. याचबरोबर वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र, प्राणीशास्त्र, इतिहास विभागाच्या शैक्षणिक सहली पार पडल्या.

निमंत्रक,
प्रा. डी. जी. दिघे

## विद्यार्थी मंडळ निवडणूक समिती

या शैक्षणिक वर्षामध्ये दि. २२/७/२००२ रोजी विद्यापीठ नियमानुसार विद्यार्थी मंडळाची निवडणूक विद्यापीठ नियमानुसार घेण्यात आली. विद्यार्थी मंडळातून दि.२/८/२००२ रोजी श्री संदीप हरी मगदूम बी.ए.-२ यांची 'विद्यापीठ सचिवपदी' निवड करण्यात आली. त्यानंतर वेळोवेळी बैठका घेऊन महाविद्यालयीन कामकाजात सहभाग घेतला.

निमंत्रक,
प्रा. एस. एन. झेंडे

## स्पर्धा परीक्षा समिती

या शैक्षणिक वर्षामध्ये स्पर्धा परीक्षा वर्गामध्ये ३८ विद्यार्थी विद्यार्थींनी आहेत. या वर्गाचे उद्‌घाटन जिमखाना प्रमुख एस. वी. देसाई यांचे हस्ते झाले. यावेळी एन. डी. पाटील व सी. वाय. जाधव सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्पर्धा परीक्षा वर्गाचे तास दररोज घेतले जातात. त्यामध्ये कॉलेजमधील तसेच बाहेरील वेगवेगळ्या विषय तज्ञांची व्याख्याने झाली. यामध्ये श्री राजेंद्र पाटील मालवे यांचे MPSC व PSI परीक्षांच्या बाबत व्याख्यान झाले. तसेच पी.एस. पाटील (राज्यशास्त्र) एस. जी. खानापुरे (स्मरणशक्ती व स्वसंमोहन), ए.आर. माने (इतिहास), प्रा. एन. एम. पाटील (भूगोल व बुध्दीमत्ता), प्रा. एस. ए. साळोखे (इंग्रजी) व प्रा.आनंद वारके (मराठी) यांची व्याख्याने झाली तसेच आज अखेर स्पर्धा परीक्षा वर्गामध्ये तीन टेस्ट घेण्यात आल्या.

निमंत्रक,
प्रा. एन. एम. पाटील

## सांस्कृतिक समिती

सांस्कृतिक विभागाने खालीलप्रमाणे उपक्रम राबविले.

१) प्रथम सत्रामध्ये विद्यार्थ्यांकरीता दि.३१/८/२००२ रोजी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यामधून विद्यार्थ्यांच्यामधील सुप्त कलागुणांची चाचपणी करण्यात आली.

२) दि. ५ सप्टें. २००२ रोजी 'शिक्षक दिन' आयोजित करण्यात आला. ६० विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे कामकाज पाहिले.

३) कोल्हापूर आकाशवाणी केंद्रावरुन दि. २५/९/२००२ रोजी विद्यार्थ्यांचा 'युवावाणी' कार्यक्रम सादर करण्यात आला.

४) शिवाजी विद्यापीठाचा २२ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव दि.२६/१०/२००२ रोजी श्री शहाजी महा. कोल्हापूर येथे पार पडला. त्यामध्ये महाविद्यालयाने लोकनृत्य, पथनाट, एकांकिका, समूहगीत, सुगमगायन, वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजूषा या स्पर्धेत सहभाग घेतला. त्यामध्ये १) पथनाट्य - प्रथम क्रमांक, २) वादविवाद - प्रथम क्रमांक, ३) वक्तृत्व - द्वितीय क्रमांक मिळाला.

५) दि. १३,१४ व १५ डिसेंबर २००२ रोजी दयानंद महाविद्यालय, सोलापूर येथे शिवाजी विद्यापीठाचा २२ वा मध्यवर्ती युवा महोत्सव आयोजित करण्यात आला. त्यामध्ये महाविद्यालयाने पथनाट्य, वादविवाद, वक्तृत्व, स्थलचित्रण, व्यंगचित्रण, भित्तीचित्रण या प्रकारात सहभाग

घेतला. त्यामध्ये १) पथनाट्य - द्वितीय, २) वक्तृत्व - प्रथम, ३) वादविवाद - प्रथम, ४) स्थलचित्रण - प्रथम मिळाला.

६) दि. ३/१/२००३ ते दि. ७/१/२००३ दरम्यान मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव संपन्न झाला. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये वक्तृत्व व वादविवादसाठी महाविद्यालयाचा विद्यार्थी संदीप मगदूम याची निवड झाली.

या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाचा व्यवस्थापक म्हणून माझी निवड झाली.

एकूण यशासाठी संस्थाध्यक्ष मा. दिनकररावजी जाधव यांचे प्रोत्साहन, मा. प्राचार्य एस. के. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रा. अशोक जानवे, प्रा. एस. जी. खानापूरे, प्रा. अनिल माने, प्रा. नेताजी पाटील, प्रा. एस. एस. पाटील व सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम केले.

निमंत्रक,
प्रा. डी. एन. पाटील

## वक्तृत्व समिती

चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील संदीप मगदूम, रणजीत मगदूम, विजय पवार, प्रदिप पाटील या स्पर्धकांनी ५० हून अधिक जिल्हा व राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धात भाग घेतला. अनेक स्पर्धात प्राविण्य संपादन केले. संदीप मगदूम याने सातारा येथील कर्मवीर वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम, विभागीय युवक महोत्सवात प्रथम क्रमांक पटकाविला.

निमंत्रक,
प्रा. ए. आर. माने

## नशाबंदी युवामंच समिती

या समितीच्यावतीने खालील विविध उपक्रम राबवले.

१) व्यसनमुक्तीवर महाविद्यालयात व परिसरात व्याख्याने व पथनाट्याचे आयोजन करुन समाजप्रबोधन केले.

२) समिती सदस्य प्रा. प्रकाश पाटील यांची दि.६/१०/२००२ तिटवे ता. राधानगरी व तुरंबे ता. राधानगरी येथे दि. ९/१०/२००२ रोजी व्याख्याने झाली.

२) प्रा. जे. जे. पाटील (भोगावती महा. कुरुकली) यांचे अर्जुनवाडा ता. राधानगरी येथे दि. १३/१२/२००२ रोजी व्यसनमुक्तीवर व्याख्यान झाले.

३) श्री जयसिंग पाटील (दै. युवा सकाळ ये वरिष्ठ उपसंपादक) यांचे महाविद्यालयात दि. ४/१/२००३ रोजी व्यसनमुक्तीवर व्याख्यान झाले.

४) दि. २६/१/२००३ रोजी 'व्यसनाचे दुष्परिणाम व व्यसनमुक्ती' या विषयावर रांगोळी स्पर्धा आणि दै. 'सकाळ' मधील 'माझी व्यसनमुक्ती' 'माझे वडील' 'वाळूचे कण' या कात्रणांचे आणि छायाचित्रांचे प्रदर्शन भरविले.

यासाठी प्राचार्य शिवाजीराव पाटील यांचे मार्गदर्शन, प्रा.प्रकाश पाटील, प्रा.सतिश पाटील व सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि संस्थाप्रमुखांचे आशीर्वाद आमच्या पाठीशी आहेत.

निमंत्रक,
प्रा. एस. डी. पाटील

## उच्च शिक्षण समिती

या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी बी.ए. भाग १ साठी गृहपाठ, बी.ए. भाग २ साठी युनिट टेस्ट व बी.ए. भाग ३ साठी सेमिनार हे उपक्रम राबविले.

निमंत्रक,
डॉ. देसाई एस. बी.

## माहिती पत्रक व तास नियोजन समिती

या शैक्षणिक वर्षासाठी या समितीने पुढील कार्य केले आहे.

१) शास्त्र शाखा वेळापत्रक २० जून ते १ जुलै २००२ पर्यंत तात्पुरते तयार केले व त्यांनतर प्रात्याक्षिक व तासांचे अंतिम वेळापत्रक तयार कले.

२) या शैक्षणिक वर्षाचे माहितीपत्रक इंग्रजीत तयार केले.

३) बी.एस्सी भाग १ साठी प्रा. एस. एच. पाटील व बी.एस्सी भाग २ साठी प्रा. एस. एन. झेंडे कमिटी सदस्य तासांचे नियोजन करत होते. ज्या विषयांच्या तासांचे नियोजन होत नाही ते नोटीसद्वारे किंवा प्रत्यक्ष वर्गामध्ये विद्यार्थ्यांना सांगत होते.

या कमिटीस मा. प्राचार्यसो व प्रा. सी. वाय. जाधव यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

निमंत्रक,
प्रा. एस. ए. गंगावणे व प्रा. एस. ए. साळोखे

## छंद समिती

या शैक्षणिक वर्षासाठी या समितीने पुढीलप्रमाणे कामकाज केले आहे.

१) छंद समितीने वार्षिक नियोजन करण्यासाठी कमिटी सदस्य मिटींग घेतली.

२) महाविद्यालयीन सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी त्यांच्या कलागुणाना वाव देण्यासाठी व जाणून घेण्यासाठी नोटीस काढण्यात आली. त्यामध्ये काहींना चित्रकला, स्केचेस तसेच परकिय चलन जमविणे, शिवकालीन जुणी नाणी संग्रह करण्याचा छंद होता त्यांना कमिटीने मार्गदर्शन केले.

३) दि.२६ जाने. २००३ रोजी छंद कमिटीमार्फत प्रदर्शन भरविण्यात आले. त्यामध्ये पेटींग, स्केचेस व श्रीलंका-भूतानचे चलन संग्रह तसेच शिवकालीन मुद्रा संग्रह प्रदर्शनात मांडण्यात आल्या.

कमिटीमध्ये काम करताना मा.प्राचार्यांनी मार्गदर्शन केले.

निमंत्रक,

प्रा. एस. ए. गंगावणे व प्रा. एस. ए. साळोखे

## ग्रंथालय समिती

ग्रंथ, ग्रंथ-जगत्, ग्रंथालय, वाचन-चळवळ व वाचक या आणि यासारखे विषय आपल्या समोर चर्चेत असतात. तरी सुध्दा ज्ञानार्जनाकरीता पारंपारिक स्वरुपातील ग्रंथालय ही संकल्पना हळू-हळू बदलत चालली आहे. बदलत्या संकल्पनेनुसार कमिटीने ग्रंथालयाच्या संगणीकीकरणाचा मानस व्यक्त केला असून काही बाबी अजून विचारधीन आहेत.

राष्ट्रीयस्तरावर होऊ घातलेल्या शैक्षणिक बदलत्या धोरणानुसार कमिटीने क्रमिक पुस्तकांऐवजी संदर्भग्रंथाना प्राधान्य देण्याचे ठरविले असून त्या दिशेने कार्यवाही सुरु आहे. सन २००२-२००३ मध्ये ग्रंथालयाचा संख्याशास्त्रीय तपशील खालील प्रमाणे आहे.

एकूण ग्रंथ संख्या : ९२४६/-

अंदाजे किंमत ५,६५,७९५/-

पैकी एकूण संदर्भ ग्रंथ : ३४७०/-

पैकी एकूण क्रमिक पुस्तके : २७२३/-

बुक बँकीग पुस्तके : १८००/-

सन २००२-२००३ तील खरेदी : ३८१ पुस्तके,

अंदाजे खर्च ४२,४२७/-

मासिके व नियतकालिके : १८

अंदाजे एकुण खर्च ३०००/-

जिंदाल ट्रस्ट कडून दिलेली पुस्तके : २३१

अंदाजे एकुण खर्च २५०००/-

सद्यस्थितिला महाविद्यालयातील विद्यार्थी व स्टाफ मिळून अंदाजे ८०० जण या ग्रंथालयाचा लाभ घेतात.

ग्रंथालयाचे काम सुकर होण्याच्या दृष्टीने आम्हास मा. चेअरमन, मा. व्हा. चेअरमन, मा. सेक्रेटरी व महाविद्यालयाच्या मा. प्राचार्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

ग्रंथपाल,

श्री. अे. टी. वागरे

## एन. एस. एस. विभाग

या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटने खालील उपक्रम यशस्वी राबविले.

१) एड्स रक्षाबंधन दिन : आमच्या युनिटमधील स्वयंसेविकांनी रक्षाबंधनासाठी एड्स जनजागृती संदेश समाविष्ट केलेल्या खास राखी बनविल्या. राष्ट्रीय महामार्ग कोल्हापूरलगतच्या महाडिक पेट्रोलपंपासमोर सुमारे दिडशे ट्रकचालकांना राख्या घालून व एड्स पासून दूर राहण्याचे वचन घेऊन हा दिन साजरा केला. कार्यक्रमाचे उद्घाटन शिरोलीचे उपसरपंच उदयसिंह पाटील यांच्या हस्ते व पंचायत सदस्य अनिल खवरे यांच्या उपस्थित झाले. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर म्हणजे गुजराथ, तामिळनाडू, केरळ, राजस्थान याठिकाणी हा संदेश गेल्याने युनिटने समाधान व्यक्त केले. या विशेष राख्यांवर "भैया एड्ससे दूर रहना" "एड्सपासून सावध रहा" अशी वाक्ये होती.

२) महाविद्यालय आवार स्वच्छता : महाविद्यालयाच्या आवाराची स्वच्छता युनिटच्या स्वयंसेवकांनी दोनदा केली. यामध्ये उपद्रवी गवत निर्मुलन, मुतारी स्वच्छता, महाविद्यालयाच्या भितींची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमास नव निर्वाचित आ. शरद पाटील (शिक्षक) यांनी भेट देऊन स्वयंसेवकांना संत गाडगेबाबांचा आदेश घेण्यासाठी मार्गदर्शन केले.

३) रक्तदान शिबीर : श्री शाहू ब्लड बँक यांच्या विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. यामध्ये प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थीनी असे एकूण ७८ जणांनी रक्तदान केले. या शिबीराचे उद्घाटन बिद्री कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन श्री विजयसिंह मोरेसो यांनी केले.

४) हृदय शस्त्रक्रियेसाठी मदत निधी : युनिटने देवचंद महाविद्याय येथे सायन्स विभागात शिकत असणाऱ्या सचिन मांगोरे रा. पिंपळगांव याच्या शस्त्रक्रियेसाठी रु.२२६५/- मदतनिधी गोळा करुन तरुण भारतचे पत्रकार रविंद्र फडके यांच्या हस्ते दिला. यावेळी विद्यापाठाचे एन.एस.एस.समन्वयक प्रा सुखदेव भोळे यांनी 'एन.एस.एस. व ग्रामविकास' यावर मार्गदर्शन केले.

५) महिला मेळावा : आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त बिद्री ता.कागल या गावात महिलांसाठी साक्षरता मेळावा घेण्यात आला. मेळाव्यास शंभर महिला हजर होत्या. प्रा. आर. बी. चोपडे यांनी व्याख्यानातून व एकपात्री प्रयोगातून साक्षरतेचे महत्व पटवून दिले. मेळाव्याचे उद्घाटन बिद्री गावचे सरपंच श्री दशरथ लोहार यांनी केले तर उपसरपंच श्री बाजीराव पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या.

६) एड्स पथनाट्य : युनिटचे स्वयंसेवक हा उपक्रम गेली तीन वर्षे सातत्याने राबवित आहेत. गावोगावी पथनाट्य करुन एड्स जनजागृतीचा संदेश देत आहे. यावर्षी नेहरु युवा मंच, भारत सरकर, कोल्हापूर शाखा यांनी शाहू महाविद्यालय, कोल्हापूर येथे भरविलेल्या पथनाट्य स्पर्धेत आमच्या युनिटने द्वितीय क्रमांक पटकावून शिल्ड व प्रमाणपत्रे मिळविली. या पथनाट्याचे बिद्री कारखान्याचे चेअरमन श्री दिनकराराबजी जाधवसो यांनी कौतुक केले.

या सर्व कामी प्रा. वाय. एस. पाटील, प्रा. डी. डी. कोमेजवार, प्रा. एच.डी.धायगुडे, प्रा. एन.डी.पाटील, प्रा.डॉ. एस. बी. देसाई, प्रा. डी.के.शिंदे, प्रा. एस.एस.पाटील यांनी मदत केली तर प्राचार्य एस.के. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

प्रकल्पाधिकारी

प्रा. आर. बी. चोपडे

## अंतर्गत परीक्षा समिती

या शैक्षणिक वर्षामध्ये कला विभागासाठी दि. २२/१०/२००२ ते दि.२४/१०/२००२ अखेर ५० गुणांची प्रथम सत्र परीक्षा तर ११/२/२००३ ते दि. २१/२/२००३ अखेर १०० गुणांची सराव परीक्षा घेण्यात आली. शास्त्र शाखेसाठी बी. एस्सी. भाग - १ या वर्गाची २५ मार्कांची चाचणी परीक्षा दि.७ व ८ सप्टेंबर २००२ रोजी घेण्यात आली. याच वर्गासाठी ५० गुणांची प्रथम सत्र परीक्षा दि. २६ ते ३० नोव्हेंबर २००२ रोजी घेण्यात आली. बी. एस्सी. भाग - १ ते ३ या वर्गांची १०० गुणांची सराव परीक्षा दि. २४/२/२००३ ते दि. ६/३/२००३ पर्यंत घेण्यात आली.

बी.ए.भाग-१ वर्गासाठी गृहपाठ तर बी.ए.भाग-३ या वर्गासाठी सेमिनार घेण्यात आले. तर बी. एस्सी. भाग - ३ वर्गासाठी चाचणी परीक्षा व सेमिनार घेण्यात आले.

परीक्षा घेण्यासाठी प्रा. डी.के.शिंदे, प्रा. आर.एस.पाटील, प्रा. एस.एच.पाटील या समिती सदस्यांचे सहकार्य लाभले.

निमंत्रक,

प्रा.एल.एस.कारे

## इंग्रजी फोरम

१) प्रथम सत्रामध्ये "Meera Krishna Corporation", Banglore यांची Self-Confidence & Self Esteem या विषयावरील व TOEFL परीक्षांची माहिती करुन देणारी ध्वनिफीत स्पे. इंग्रजीच्या विद्यार्थ्यांना ऐकविण्यात आली.

२) बी. ए. १ ते बी. ए. ३ मधील गरजू विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणसाठी विशेष तासांचे आयोजन करण्यात आले.

३) दि. २६ सप्टें. २००२ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाने आयोजित केलेल्या Paper Reading Competition मध्ये बी. ए. ३ मधील १) नंदकुमार पाटील २) अजय पालकर ३) रणजित पाटील हे विद्यार्थी सहभागी झाले.

५) दि. १९ ऑक्टो. २००२ रोजी बी.ए.१ ते बी.ए.३ च्या ऐच्छिक इंग्रजीच्या विद्यार्थ्यांसाठी "Paper Reading" म्हणजे काय असते हे कळावे म्हणून कॉलेज अंतर्गत Paper Reading Session चे आयोजन केले.

६) दि. २६ ऑक्टो. २००२ रोजी Inter collegate Paper Reading Competition चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुरगूड, राधानगरी, आजरा आणि निपाणी येथील कॉलेजमधील बी.ए.२ आणि बी.ए.३ चे विद्यार्थी स्वखर्चाने उपस्थित राहिले होते. एकूणच ही स्पर्धा बाहेरील कॉलेजच्या व आमच्याही विद्यार्थ्यांना स्फूर्तीदायक व प्रेरणादायक ठरली. यावेळी विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथील इंग्रजीचे प्रा. एस. वाय. होनगेकर यांचे "इंग्रजी प्राप्तीसाठी करावयाचे प्रयत्न" "Efforty for

Achievement of English" या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

७) बी.ए.३ स्पे. इंग्रजीच्या विद्यार्थ्यांना The Cassell Conacise Dictionary च्या सी.डी.ची. प्रात्यक्षिके गरजेनुसार वारंवार दाखविण्यात आली.

हे सर्व कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन आणि विभागातील माझे सहकारी प्रा. डी. एन. पाटील व प्रा. एस.ए. साळोखे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

निमंत्रक,
प्रा. सी.वाय.जाधव

## मागासवर्गीय विद्यार्थी विकास मंच

१) सोमवार दि. १५/७/२००२ रोजी मागासवर्गीय विद्यार्थ्यांची मिटींग आयोजित करुन त्यांच्याकडून बी.सी. स्कॉलरशीप फॉर्म भरुन घेतले व प्रा. जानवे, प्रा. माने, प्रा. अशोक माने यांनी 'रिझर्व्हेशन' संदर्भात सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२) दि. १० ऑक्टों. २००२ रोजी प्रा. अनिल माने, प्रा. नेताजी पाटील यांनी स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले.

३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नोकरी संदर्भात मार्गदर्शन मिळण्यासाठी वर्तमानपत्रामधील जाहिराती महाविद्यालयाच्या काच फलकात लावण्यात आल्या.

४) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी संदर्भात आसपासच्या गावातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांना समिती सदस्य प्रा. अशोक माने व प्रा. धनंजय दिपे इ. भेटी दिल्या.

निमंत्रक,
प्रा. अशोक जानवे

## क्रीडा विभाग

या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाने कोल्हापूर जिल्हा विभागीय व्हॉलीबॉल कुस्ती, पोहणे, ॲथेलेटीक्स, जिमनॅस्टीक इ. क्रीडा स्पर्धेत सहभाग घेऊन स्पृहणीय यश मिळविले आहे.

१) वारनानगर येथे दि.२ ते ४ सप्टें. २००२ रोजी झालेल्या कुस्ती स्पर्धेत विक्रम बाळकृष्ण पाटील बी.ए.भाग २ याने ६२ किलो गटात उपविजेतेपद पटकावले. त्याची सातारा येथील आंतरविभागीय स्पर्धेस निवड झाली.

२) वारणानगर येथे दि. ६ व ७ ऑक्टो. २००२ रोजी झालेल्या ॲथेलेटीक्स विभागीय स्पर्धेत नामदेव बाजीराव पाटील बी.ए.भाग १ याने थाळीफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तर भिमराव रघुनाथ पोवार बी.ए.भाग १ याने भालाफेक स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला. त्याची सांगोला येथील आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

३) सांगोला येथे झालेल्या आंतरविभागीय स्पर्धेमध्ये नामदेव बाजीराव पाटील याने शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकाविला.

४) कोल्हापूर येथे दि. २१ ऑक्टो. २००२ रोजी झालेल्या आंतरविभागीय जिमनॅस्टीक स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या संघाने उपविजेते पद पटकाविले. संघातील सुतार मोहन नारायण बी.ए.भाग १ व चौगले युवराज लक्ष्मण बी.ए.भाग १ यांची कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे झालेल्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड झाली.

५) महाविद्यालयाचा खेळाडू बाजीराव सातप्पा परीट याने बुसान, द. कोरीया येथे झालेल्या अपंगांच्या भाला फेक स्पर्धेत चौथा क्रमांक पटकाविला.

६) दि. २८ व २९ जाने. २००२ रोजी उत्साहाच्या वातावरणात वार्षिक क्रीडा स्पर्धा पार पडल्या. यामध्ये व्हॉलीबॉल, क्रिकेट, कबड्डी या सांघिक स्पर्धा तर बुध्दीबळ ही वैयक्तिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आली.

या कामी संस्था अध्यक्ष मा. दिनकररावजी जाधवसो, माजी संस्था उपाध्यक्ष विजयसिंह मोरेसो, संस्था सचिव, मा. प्राचार्य, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

शारीरिक शिक्षण संचालक,
प्रा. एन. डी. पाटील

एकंदरीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणेसाठी सर्व प्राध्यापकांचे प्रयत्न मा. प्राचार्यंचे मार्गदर्शन संस्थेची प्रेरणा नेहमीच मिळत असते.

अशा प्रकारे चालू शैक्षणिक वर्षात जिमखाना अध्यक्ष म्हणून काम करत असतांना मला माझे सहाकरी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. त्यांच्या सहकार्याशिवाय अतिरिक्त जबाबदारी पार पाडणे शक्य नव्हते.

आपला,
डॉ. देसाई एस. बी.

# वैयक्तिक अहवाल

### ✿ प्रा. अनिल माने

१) रविवार ३०/६/०२ रोजी राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी यांनी 'अध्यापन पध्दती व तंत्र' यावरील एकदिवसीय कार्यशाळेत सहभाग. २) म्हाळुंगे, ता. करवीर येथे प्राथमिक शिक्षक सहविचार सभेमध्ये 'अंधश्रध्दा निर्मूलनासाठी आपण काय करु शकतो' या विषयावर मार्गदर्शन केले. ३) दि. १४ जाने. २००३ रोजी कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर येथे 'मनुवाद्यांचा दहशतवाद' या विषयावरील सेमिनारचे आयोजन केले.

### ✿ प्रा. डी. के. शिंदे

१) "दि इमर्जन्स ऑफ निओ-मिल्कमेन इन रुरल मेटींग" हा शोधनिबंध "सोशल चेंज" सप्टेंबर २००१ या राष्ट्रीय संशोधन पत्रिकेत मध्ये प्रसिध्द. २) कोल्हापूर जिल्हा प्राध्यापक पतसंस्थेत, सदस्य, पुणे विभाग शिक्षक उमेदवार प्रा. डॉ. पुरनचंद्र पुंजाळ यांच्याद्वारे ता. हातकणंगले तहसिल निवडणूक कार्यालयात दि. २३/६/०२ रोजी निवडणूक प्रतिनिधी म्हणून प्रत्यक्ष उपस्थित. ३) शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेचे दुसरे अधिवेशन दि. ३० व ३१ मार्च २००२ रोजी हुतात्मा संकुल, वाळवा येथे संपन्न झाले त्यामध्ये सहभाग. ४) बुधवार दि. १७/७/०२ रोजी बिद्री कारखाना परिसर व बोरवडे गावी लोकसंख्या जनजागरण अभियान सांगता समारंभात 'लोकसंख्या' या विषयावर विचार मांडले. ५) दि. २२/८/०२ रोजी 'रक्षाबंधन' कार्यक्रमांचे औचित्यसाधून एन.एस.एस. मधील विद्यार्थीनीनी राष्ट्रीय महामार्ग शिरोली येथे ट्रक ड्रायव्हर्स व क्लिनर्सना 'राखी' बांधून एड्स मुक्त राहण्याचा संदेश दिला. त्यावेळी मुलींना मार्गदर्शन करण्यात सहभाग. ६) ५ सप्टेंबर २००२ रोजी शिक्षक दिनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमोर 'डॉ. राधाकृष्णन यांचे शैक्षणिक योगदान' विषयावर विचार मांडले. ७) रविवार ३०/६/०२ रोजी राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी यांनी 'अध्यापन पध्दती व तंत्र' यावरील एकदिवसीय कार्यशाळेत सहभाग. ८) बुध दि. २ ऑक्टोंबर ०२ रोजी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) ने मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली येथे आयोजित केलेल्या 'लैंगिक छळ/अत्याचार व कायदा' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत सहभाग. ९) दि. ११/१०/०२ ते २/११/०२ या कालावधीत अॅकेडामिक स्टाफ कॉलेज, अलिगड मुस्लिम विद्यापिठ, अलिगड (U.P.) येथे रिफ्रेशर कोर्स पुर्ण केला.

### ✿ प्रा. डी. एन. पाटील

Shivaji University English Traeheri Association, Kolhapur चे चौथे वार्षिक अधिवेशन छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे दि.२२ व २३ नोव्हें. २००२ दरम्यान संपन्न झाले. त्यामध्ये मी सहभागी झालो.

तसेच पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव दि.०३ जाने. २००३ ते दि. ०७/१/०३ दरम्यान मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे पार पडला. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सव संघाचे संघव्यवस्थापक म्हणून काम पाहिले.

### ✿ प्रा. एन. एम. पाटील

१) दि. १० ऑगष्ट २००२ रोजी 'मागासवर्गीय विद्यार्थी विकास मंच' वतीने घेण्यात आलेल्या 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' वर्गाला स्पर्धा परीक्षेसंदर्भात मार्गदर्शनपर व्याख्यान. २) B.Sc. I, II & III च्या विद्यार्थ्यांना 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्याने'. ३) १४ जाने. २००३ रोजी महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने 'भूगोल दिन' पार पाडण्यात आला.

### ✿ प्रा. वाय. एस. पाटील

दि. २३/२/२००३ रोजी एक दिवसाच्या "Applications of Statustics" या विषयावर झालेल्या वर्कशॉपसाठी मुधोजी कॉलेज, फलटण येथे उपस्थित.

### ✿ प्रा. डॉ. एस. बी. देसाई

१) राखी पौर्णिमे दिवशी महाविद्यालयीन विद्यार्थीनींकडून ट्रक ड्रायव्हरनां राखी बांधण्याचा कार्यक्रम शिरोली येथे झाला. त्यामध्ये सहभाग होवून ट्रक ड्रायव्हरना एड्स पासून दूर राहणे विषयी मार्गदर्शन केले. २) इयत्ता चौथीच्या स्कॉलरशिप परीक्षेत राज्यात प्रथम आलेली अर्जुनवाडा, ता. राधानगरी येथील कु. प्रियांका पाटील हिचा शिरोलीतील कौतुक बाल

विद्यालयातील सत्कार कार्यक्रमात सहभाग. 'पाल्याच्या यशासाठी पालकांची जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन केले. ३) हिंदीची जेष्ठ लेखिका मैत्रेयी पुष्पा यांच्या उपस्थित संपन्न झालेल्या राष्ट्रीय अधियेशनात सहभाग. सदर अधिवेशन शिवाजी विद्यापीठ येथे दि.२० व २१ फेब्रु. २००३ रोजी संपन्न झाले. ४) दि.३ ते २२ जून २००३ रोजी सिमला येथे झालेल्या उजाळा वर्गात सहभागी होउन 'अे' श्रेणी मध्ये सहभाग प्रमाणपत्र प्राप्त केले.

### ✿ प्रा. पी. एस. पाटील

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागामध्ये विद्यार्थ्यांना 'स्थानिक स्वराज्य संस्था व राज्यघटना' विषयावरती व्याख्याने दिली. त्याचा विद्यार्थ्यांना स्पर्धेपरीक्षेसाठी खूप उपयोग होईल. तसेच या विषयावरती आणखी काही व्याख्याने व्हावीत असे वाटते.

### ✿ प्रा. एम. व्ही. टाकळे

१) महाविद्यालयाच्या B.Sc.III (Physics) च्या सहलीबरोबर भाभा अणुशक्ती केंद्र मुंबई व होमी भाभा सेंटर फॉर सायन्स इश्यु. मुंबई येथे नियोजनबध्द भेट देऊन सहल यशस्वीरित्या पूर्ण केली. २) १ जाने. २००३ रोजी शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातर्फे आयोजित विद्यार्थी मेळाव्यात हजर राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ३) राधानगरी येथील तालुका विज्ञान प्रदर्शनामध्ये प्रमुख पंच म्हणून काम पाहिले. ४) महाविद्यालय व मराठी विज्ञान परिषद, बिद्री विभागतर्फे आयोजित शिक्षक-शास्त्रज्ञ-शेतकरी मेळाव्यात महत्वपूर्ण जबाबदाऱ्या पूर्ण केल्या. ५) दि.२८/३/२००३ रोजी दुपारच्या सत्रामध्ये उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना, खगोलशास्त्रावर स्लाईड-शोसह मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. ६) सावंतवाडी येथे दि. १९/३/२००३ रोजी इंडिअन असो. फॉर फिजिक्स टिचर तर्फे आयोजित Problem Solning Session मध्ये सहभाग घेतला. ७) रत्नागिरी येथे गोगटे-जोगळेकर महाविद्यालयामध्ये पदवीत्युत्तर विभागाकडे Classical-Mechanics वर Vishing-fellow म्हणून महत्वपूर्ण सहभाग. ८) महाविद्यालयातील NAAC विभागाकडे रिपोर्ट-ट्रान्सलेटर व संपादन कामामध्ये महत्वपूर्ण जबावदाऱ्या पूर्ण करत आहे. ९) कोलहपूर येथील 'रंगबहार' या Artist-Asjoiation मध्ये Demonstration चे नियोजन व सहभाग. १०) विभागातील विद्यार्थ्यांना Internet मधून विषयांचा परिचय करुन दिला.

### ✿ प्रा. एस. ए. गंगावणे

१) न्यु कॉलेज, कोल्हापूर One day seminar on revised syllabus in physics 19th jan 2003 मध्ये सहभाग घेतला.

### ✿ प्रा. सी. वाय. जाधव

१) 'Shivaji University English Teachers' Association, Kolhapur यांनी काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले, ता. पाटण, जि. सातारा येथे दि. १ स्पटेंबर २००२ रोजी आयोजित केलेल्या एकदिवसीय सेमिनारला उपस्थिती. २) शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण आणि विस्तार कार्य विभागाच्या वतीने "नॅक आणि निरंतर व विस्तार शिक्षण" या विषयावर आयोजित केलेल्या एकदिवसीय सेमिनारला उपस्थिती. ३) सुटाच्यावतीने दि. १३ ऑक्टो. २००२ रोजी "असेसमेंट ॲण्ड अक्रीडीटेशन ऑफ कॉलेजीस" या विषयावरील एकदिवसीय नॅकच्या कार्यशाळेस उपस्थिती.

### ✿ डॉ. कुलकर्णी एस्. एन्.

१) दि. १७ व १८ ऑगस्ट २००२ रोजी मराठी विज्ञान परिषदेच्या मुंबई येथे झालेल्या चर्चासत्रात सहभाग. २) दि. १६ सप्टें. २००२ रोजी शिवाजी विद्यापीठ प्रौढ व निरंतर विभागामार्फत आयोजीत 'नॅक' च्या चर्चा सत्रात सहभाग. ३) दि. १ जानेवारी २००३ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील फिजिक्स विषयाच्या विद्यार्थ्यांच्या Annual Meet मध्ये सहभाग. ४) दि. १५,१६ व १७ जानेवारी २००३ रोजी भाभा अणुसंशोधन केंद्र व होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन, मुंबई येथे भेट. ५) दि. २८ फेब्रुवारी २००३ रोजी महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा केला.

### ✿ प्रा. एस. डी. पाटील

१) 'व्यसनमुक्त युवक काळाची गरज' या विषयावर आकाशवाणी केंद्र, कोल्हापूर 'युवावाणी या कार्यक्रमात व्याख्यान.२) सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड येथे साहित्यिक महादेव मोरे यांच्या दि:१/१०/२००२ रोजी झालेल्या 'मी व माझी साहित्य निर्मिती' या प्रकट मुलाखतीस उपस्थित. ३) दि. ९/१/२००३ रोजी बेलवळे खुर्द, ता. कागल येथे स्नेहसंमेलनात, दि. १३/२/२००३ रोजी खेबवडे, ता. करवीर येथे निरोप व पारितोपिक वितरण समारंभामध्ये तर दि. १५/२/२००३ रोजी वाचणी, ता. कागल सदिच्छा समारंभात मार्गदर्शन.

४) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील मराठी विभागात दि. १३ व १४ जानेवारी २००३ इ. रोजी झालेल्या 'समीक्षा पध्दती व उपयोजन' या विषयावरील चर्चासत्रास उपस्थित. ५) दि. ३० जून २००३ रोजी रुकडी येथे झालेल्या 'अध्यापन पध्दती व तंत्रे' या विषयावरील कार्यशाळेत सहभाग. ६) गारगोटी येथील वक्तृत्व स्पर्धेस परीक्षक म्हणून काम पाहिले. ७) बी.ए. व बी.एस्सी. भाग ३ च्या सदिच्छा समारंभाचे नियोजन. ८) दि. ९/३/२००३ रोजी राधानगरी येथे झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनास उपस्थिती.

### ✿ प्रा. आनंद वारके

१) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील मराठी विभागात दि. १३ व १४ जानेवारी २००३ इ. रोजी झालेल्या 'समीक्षा पध्दती व उपयोजन' या विषयावरील चर्चासत्रास उपस्थित. २) दि. ३० जून २००३ रोजी रुकडी येथे झालेल्या 'अध्यापन पध्दती व तंत्रे' या विषयावरील कार्यशाळेत सहभाग. ३) कोल्हापूर आकाशवाणी केंद्रावर 'बाल जगत' या कार्यक्रमात बाल कथा सादर. ४) श्री शाहू कुमार भवन, कासारवाडा येथे झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या पहिल्या सहविचार सभेत 'आजची शिक्षण पध्दती' या विषयावर व्याख्यान. ५) दि. ६ ते २८/९/२००२ पर्यत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे मराठी विषयाचा तिसरा रिफ्रेशर कोर्स पुर्ण. ६) मुलूंड महाविद्यालय, मुंबई यांच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेस उपस्थित.

### ✿ प्रा. डॉ. एस. जी. गायकवाड

१) मुलूंड महाविद्यालय, मुंबई येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेस उपस्थित. २) दि. ९ ते ११ ऑगस्ट २००३ रोजी दयानंद कॉलेज, सोलापूर येथे झालेल्या Vistas of Computer's in life sciences या विषयावरील सेमीनारला उपस्थित.

### ✿ प्रा. एल. एस. करपे

१) दि. ३ ते १४ फेब्रुवारी २००३ पर्यंत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे झालेल्या अर्थशास्त्र विषयाचा रिफ्रेशर कोर्स पुर्ण केला. २) दि. १९ मार्च २००३ रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे झालेल्या अभ्यासक्रम उजाळा वर्गास उपस्थित.

### ✿ प्रा. डी. जी. दिघे

१) दि. २० व २१ फेब्रुवारी २००३ रोजी शिवाजी विद्यापीठ व हिंदी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने लेखिका मैत्रेयी पुष्पा व राजेंद्र यादव यांच्या उपस्थितीत झालेल्या 'राष्ट्रीय संगोष्टी' मध्ये सहभाग.

### ✿ प्रा. एच. डी. धायगुडे

१) दि. १९ नोव्हें. ते ११ डिसें. २००३ पर्यंत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे रिफ्रेशर कोर्स पुर्ण केला. २) न्यू कॉलेज, कोल्हापूर येथे झालेल्या बी.एस्सी. भाग १ या वर्गाच्या नविन अभ्यासक्रमाच्या सेमीनारमध्ये सहभाग.

### ✿ प्रा. ए. बी. माने

१) दि. ३० जून २००३ रोजी रुकडी येथे झालेल्या 'अध्यापन पध्दती व तंत्रे' या विषयावरील कार्यशाळेत सहभाग. २) १४ एप्रिल २००२ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंत दिवशी म्हसवे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे 'डॉ. बाबासाहेब आंबेकडर आणि भारतीय राज्यघटना' याविषयावर व्याख्यान दिले. ३) २ ऑक्टोंबर २००२ रोजी महात्मा गांधीजी यांच्या जयंती दिवशी दूधसाखर विद्यानिकेतन प्राथमिक शाळा, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे 'गांधीजींचे आर्थिक व सामाजिक विचार' या विषयावर व्याख्यान दिले. ४) दि. १९ व २० मार्च २००३ रोजी देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे आयोजित केलेल्या राज्यशास्त्र परिषदेच्या बाराव्या अधिवेशनामध्ये सहभागी.

### ✿ प्रा. एन. डी. पाटील

१) दि. २६ नोव्हे. ते १७ डिसे. २००२ पर्यंत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे झालेला शारीरिक शिक्षण विषयाचा रिफ्रेशर कोर्स पुर्ण. २) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर बास्केट बॉल महिला संघ निवड समितीच्या चेअरमनपदी निवड. ३) कराईकुडी, आंध्रप्रदेश येथे झालेल्या दक्षिण, पश्चिम आंतरविद्यापीठ बास्केट बॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे प्रशिक्षक म्हणून निवड ४) एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई येथे झालेल्या सहाव्या महाराष्ट्र आंतर विद्यापीठ अश्वमेध स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या बास्केट बॉल महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून काम केले. यावेळी या संघाला सुवर्णपदक प्राप्त झाले.

* * *

# प्राध्यापक वृंद

सन २००२-२००३

## प्राचार्य शिवाजीराव पाटील *एम.एस्सी.*

### मराठी

प्रा. ए. जे. वारके — एम.ए.बी.एड.सेट

प्रा. एस. डी. पाटील — एम.ए.बी.एड.एम.फिल.

### हिंदी

प्रा. डॉ. एस. बी. देसाई — एम.ए.पीएच.डी

प्रा. डी. जी. दिघे — एम.ए.

### इंग्रजी

प्रा. सी. वाय. जाधव — एम.ए.(पीजीडीटीई)

प्रा. डी. एन. पाटील — एम.ए.

प्रा. एस. ए. साळोखे — एम.ए.एम.एड.

### इतिहास

प्रा. ए. आर. माने — एम.ए.बी.एड.सेट

प्रा. एस. आर. पाटील — एम.ए.

### समाजशास्त्र

प्रा. डी. के. शिंदे — एम.ए.एम.फिल.

प्रा. ए. डी. जानवे — एम.ए.

### अर्थशास्त्र

प्रा. एल. एस. करपे — एम.ए.बी.एड.एम.फिल

### राज्यशास्त्र

प्रा. ए. बी. माने — एम.ए.

प्रा. पी. एस. पाटील — एम.ए.

### भूगोल

प्रा. एन. एम. पाटील — एम.ए.सेट

### शारीरिक शिक्षण

प्रा. एन. डी. पाटील — एम.पी.एड.

### पदार्थ विज्ञान

प्रा. एच. डी. धायगुडे — एम.एस्सी.

प्रा. डॉ. एस. एन. कुलकर्णी — एम.एस्सी.पीएच.डी.

प्रा. एम. व्ही. टाकळे — एम.एस्सी.

प्रा. एस. ए. गंगावणे — एम.एस्सी.

प्रा. कु. एस. के. संकपाळ — एम.एस्सी.

### रसायनशास्त्र

प्रा. एस. एन. झेंडे — एम.एस्सी.

प्रा. आर. बी. चोपडे — एम.एस्सी.

प्रा. एस. के. सावंत — एम.एस्सी.

प्रा. एस. जी खानापूरे — एम.एस्सी.

प्रा. सौ. एस. ए. कांबळे — एम.एस्सी.

प्रा. कु. एस. एम. आंगज — एम.एस्सी.

प्रा. यु. एम. बोडके — एम.एस्सी.

## प्रशासकीय कर्मचारी
### सन २००२-२००३

### वनस्पतीशास्त्र

प्रा. डॉ. एस. जी. गायकवाड एम.एस्सी.पीएच.डी.

प्रा. एस. एस. पाटील एम.एस्सी.एम.फिल.

प्रा. पी. बी. पाटील एम.एस्सी.

प्रा. सौ. जे. एम. पाटील एम.एस्सी.

### प्राणीशास्त्र

प्रा. आर. एस. पाटील एम.एस्सी.

प्रा. सौ. जे. ए. कांबळे एम.एस्सी.

### गणित

प्रा. डी. डी. कोमेजवार एम.एस्सी.एम.फिल.

### संख्याशास्त्र

प्रा. वाय. एस. पाटील एम.एस्सी.

प्रा. एस. एच. पाटील एम.एस्सी.

### ग्रंथपाल

प्रा. ए. टी. वागरे एम.ए.बी.लिब.सायन्स



### कार्यालय

प्रा. पी. व्ही. पाटील एम.कॉम.

प्रा. एम. के. भोईटे बी.कॉम.

प्रा. आर. एच. कंकाळ बी.कॉम.

प्रा. आर. एम. देसाई बी.ए.

प्रा. व्ही. डी. तळेकर बी.ए.१

### प्रयोगशाळा सहाय्यक

श्री. एस. के. पाटील बी.ए.

### प्रयोगशाळा परिचर

श्री. बी. एस. सुतार

श्री. आर. पी. आळवेकर

श्री. ओ. एम. घुंगरे पाटील

श्री. एन. व्ही. पाटील

श्री. ए. बी. हावलदार

### ग्रंथालय परिचर

श्री. एन. एस. बारके एम.ए. (इंग्रजी) बी.एड.

श्री. एस.टी. जोशी

### शिपाई

श्री. जे. डी. कांबळे

श्री. एस. एन. कांबळे



# कर्मचारी वृंद



प्राध्यापक वृंद
कला विभाग



प्राध्यापक वृंद
शास्त्र विभाग



प्रशासकीय
कर्मचारी वृंद

# श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री [मौनीनगर],

तालुका - कागल, जिल्हा - कोल्हापूर (महाराष्ट्र)


तार - ''दूधसाखर बिद्री''
एस. टी. डी. कोड : (०२३२५)
फॅक्स : २५४९७२

फोन : २५४९२२ ते २५४९२६ बिद्री एक्स्चेंज
कोल्हापूर ऑफीस - (०२३१) २६६१५७८, २६६२९११


## आमच्या कारखान्याची ठळक वैशिष्ट्ये

१. कारखान्याच्या गळीताची सुरवात सन १९६३ साली १२५० मे. टन या प्राथमिक दैनंदिन ऊस गाळप क्षमतेने झाली. सध्याची विस्तारीत दैनंदिन गाळप क्षमता ३५०० मे. टन आहे.

२. कारखान्याचे कार्यक्षेत्र राधानगरी, भुदरगड, कागल आणि करवीर या चार तालुक्यातील २१८ गांवामध्ये विस्तारीत झालेले असून, सुमारे ३५ कि. मी. परिसरामध्ये कारखान्याचे कार्यक्षेत्र आहे.

३. सन १९९४-९५ च्या गळीत हंगामात मे. वसंतदादा साखर संशोधन संस्था पुणे यांनी तांत्रिक कार्यक्षमता प्रस्तापित केलेबद्दल महाराष्ट्र राज्यातील ''द्वितीय क्रमांकाचे'' पारितोषिक देऊन कारखान्यास गौरविले आहे. तसेच याच गळीत हंगामात महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. मुंबई यांनी उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता प्रस्तापित केलेबद्दल महाराष्ट्र राज्यात ''द्वितीय क्रमांकाचे'' पारितोषिक देऊन कारखान्यास गौरविले आहे.

४. मे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी बु.॥, जि. पुणे, यांनी आमच्या कारखान्याने महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक रिड्यूसड् ओव्हर ऑल रिकव्हरी मिळविल्याबद्दल सन १९९६-९७ सालचे हंगामासाठी उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेचे ''दुसऱ्या क्रमांकाचे'' बक्षिस देऊन, तर सन १९९७-९८ सालचे हंगामासाठी तांत्रिक कार्यक्षमतेचे महाराष्ट्र राज्यात ''प्रथम क्रमांकाचे'' बक्षिस देऊन कारखान्यास गौरविले आहे.

५. कारखाना कार्यस्थळावर स्वत:ची अर्कशाळा उभारणेचा कारखान्याचा संकल्प आहे.

६. देशातील तीव्र वीज टंचाईस हातभार लावणेसाठी अंदाजे ३५ कोटी रूपयांचा वीज निर्मितीचा प्रकल्प उभारणीचे काम कारखान्याचे विचाराधीन आहे.

७. कारखान्याच्या माध्यमातून कृतीयुक्त सहभागाने दूधगंगा नदीवरील दूधगंगा प्रकल्प व वेदगंगा नदीवरील पाटगांव प्रकल्प पूर्णत्वाचे मार्गावर.

८. शासनाच्या सामाजिक कल्याण योजना आणि वेळोवेळी शासनामार्फत राबविणेत येणारे लोकाभिमुख कार्यक्रमांमध्ये कारखाना प्रत्यक्ष कृतीयुक्त सहभाग घेत असून, कार्यक्षेत्रातील लोकांचे सर्वांगिण विकासासाठी कटीबद्ध आहे.

९. कारखाना कार्यस्थळावर बालवाडीपासून कला आणि विज्ञान शाखांच्या पदवी पर्यंतचे शिक्षणाची सोय, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणेसाठी कारखाना व्यवस्थापकीय मंडळ प्रयत्नशील.

१०. केंद्र सरकारचे योजनेमधून कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादनामध्ये वाढ व्हावी म्हणून ऊस विकासाच्या विविध योजना कार्यान्वित, तसेच अद्यायावत तंत्रज्ञानाधारे ऊस पिकविण्याच्या दृष्टीने शिबिरे, मेळावे, चर्चासत्रे, प्रात्याक्षिके घेऊन तसेच बि-बियाणे, खते, किटकनाशके, औषधे अनुदानावर देऊन कारखाना सभासदांना प्रोत्साहित करणे.

११. सहकाराचे माध्यमातून कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, ऊस उत्पादक, सामान्य जनता यांचे सर्वांगिण विकासासाठी कारखाना कटीबध्द.

आर. डी. देसाई
प्र. कार्यकारी संचालक

मा. बाबासाहेब हिंदूराव पाटील
व्हा. चेअरमन

मा. दिनकरराव भाऊसाहेब जाधव
चेअरमन

आणि

सर्व सन्माननीय संचालक मंडळ, सभासद बंधू - भगिनी, खाते अधिकारी व सेवक

